सोमवार, २३ जानेवारी २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक १८६
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड




(छाया : लक्ष्मण ठाकूर)

# खारघर मॅरेथॉनला अभूतपूर्व प्रतिसाद

## तब्बल १७ हजार ८९० स्पर्धकांनी सहभागी होत दिला व्यसनमुक्तीचा संदेश

# ‘त्यांचे’ शुद्धीकरण करावे लागेल!

## शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकरांचा संजय राऊतांना टोला





**मुंबई : प्रतिनिधी**

दोन दिवसांपूर्वीच शिवसेना खासदार संजय राऊत हे जम्मू-काश्मीरमध्ये भारत जोडो यात्रेत सहभागी झाले होते. यावरून शिंदेगटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी संजय राऊतांना टोला लगावला आहे. आम्ही एखाद्या ठिकाणी गेलो की, ठाकरे गट गोमुत्र शिंपडून ती जागा पवित्र करतात, मात्र आता राहुल गांधींच्या यात्रेत सहभागी झालेल्यांचंही शुद्धीकरण करायला हवे, असे ते म्हणाले.

काश्मीरमधून कलम ३७० रद्द करणे हे बाळासाहेबांचे स्वप्न होते, मात्र ज्या काँग्रेसने या कलमाचा पुरस्कार केला, त्या काँग्रेसच्या लोकांना शिवसेनेने काश्मीरमध्ये जाऊन भेटणे, यासारखा बाळासाहेबांचा घोर अपमान असूच शकत नाही, अशी प्रतिक्रिया मंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

अनेक ठिकाणी आम्ही गेल्यानंतर ठाकरे गटाचे नेते गोमुत्राने ती जागा पवित्र करतात. त्याऐवजी आता जे लोक काश्मीरमध्ये जाऊन भारत जोडो यात्रेत सहभागी झाले, त्यांचेही शुद्धीकरण केले गेले पाहिजे, अशी खोचक टीकाही त्यांनी संजय राऊतांचे नाव न घेता केली.

मला एक दिवसासाठी पंतप्रधान केले तर मी काश्मीरमधून कलम ३७० रद्द करून दाखवेन, असे म्हणणारे बाळासाहेब कुठे आणि सत्तेसाठी काँग्रेसच्या मागे धावणारे शिवसैनिक कुठे, यावर विचार करण्याची गरज आहे, असेही म्हणाले.

दरम्यान, १४ फेब्रुवारीला राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार कोसळेल, असा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला होता. याबाबतही केसरकर यांनी प्रतिक्रिया दिली. जे लोक झोपतात, ते लोक स्वप्न बघतात आणि जी लोक काम करतात, ती लोक कायम धावत राहतात. त्यामुळे आमचे सरकार पडेल अये केवळ स्वप्नच पहावे, असेही ते म्हणाले.

## रिक्षाचालकांवर आरटीओची दंडात्मक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवीन भाडेदर लागू केल्यानंतर रिक्षा-टॅक्सीच्या मीटरमध्ये बदल करण्यासाठी चालकांना मुदतवाढ देण्यात आली होती, मात्र त्यानंतरही मीटरमध्ये बदल न करणाऱ्या रिक्षा-टॅक्सीचालकांवर नवी मुंबई आरटीओने प्रति दिवसाला ५० रुपये असा दंड आकारण्यात येत असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी दिली.


नवी मुंबई शहरातील ३७ हजार नोंदीत रिक्षांपैकी डिसेंबरपर्यंत १२ हजार रिक्षांचे मीटर रिकॅलिब्रेशन पूर्ण झाले आहे. अद्यापही मीटरमध्ये बदल न करताच काही चालक प्रवाशांकडून दरपत्रकावरूनच भाडे आकारणी करीत आहेत. त्यामुळे दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.



**पनवेल : खारकोपर येथील हनुमान मंदिराचा वर्धापन दिन सोहळा रविवारी झाला. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, कामगार नेते महेंद्र घरत यांनी भेट देऊन दर्शन घेतले. त्यांचे मंदिर कमिटीच्या वतीने स्वागत करण्यात आले. या वेळी उद्योजक जे. एम. म्हात्रे, गव्हाणच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, कोपरचे भाजप अध्यक्ष सुधीर ठाकूर, वसंत पाटील, अनंता ठाकूर, साईचरण म्हात्रे, किशोर पाटील, भाऊ भोईर, वैभव घरत, महेश घरत, विनोद पाटील, योगिता भगत, रोशन म्हात्रे आदी उपस्थित होते.**

## स्व. विनायक केशव जोशी विद्यालयात स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण




(छाया : अक्षय शार्दुल)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील तारा गावाजवळील साईगणेश एज्युकेशन सोसायटीच्या स्व. विनायक केशव जोशी नवजीवन इंटरनॅशनल स्कूलचे प्रथम वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी (दि. २१) उत्साहात झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या समारंभात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.

या वेळी भाजपचे केळवणे विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी सरपंच विद्याधर जोशी, मुख्याध्यापिका श्रद्धा मॅडम, किरण पाटील, सुषमा पाटील, बाळूशेठ पाटील, युवा नेते राजू पाटील, ग्रामपंचायत सदस्य प्रफुल पाटील, भाजप नेते चंद्रकांत पाटील, गणेश पाटील, राजू मुंबईकर, लक्ष्मण ठाकूर, अनिल पाटील, कमलाकर टाकले, दर्शन जोशी यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक आणि विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दरोडेखोरांची माहिती देणाऱ्यास कर्जत पोलिसांकडून बक्षीस

**कर्जत : प्रतिनिधी**

भोईरवाडी येथे एका फार्महाऊसवर १५ डिसेंबर २०२२ रोजी दरोडा घालण्याचा प्रयत्न झाला होता. त्या गुन्ह्यातील कोणताही आरोपी अद्याप कर्जत पोलिसांच्या हाती लागला नाही. त्यामुळे कर्जत पोलिसांनी त्या दरोडेखोरांची माहिती देणाऱ्यांना ११ हजारांचे बक्षीस जाहीर केले आहे.

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या भोईरवाडी गावातील जननी फार्महाउस असून त्या फार्महाउसमध्ये १५ डिसेंबर रोजी दरोडा घालण्याचा प्रयत्न झाला होता. ज्येष्ठ नागरिक पी. व्ही. सुब्रम्हण्यम् यांचा जननी फार्महाऊस असून त्या ठिकाणी त्यांची पत्नी आणि सासू असे एकत्र राहतात. त्यांच्या बंगल्यात १५ डिसेंबर रोजी रात्री काही अज्ञात लोक तोंडावर रुमाल बांधून आणि शस्त्रांसह फिरत असल्याचे आढळून आले होते. मध्यरात्री पाणी पिण्यासाठी उठलेले सुब्रह्मण्यम् यांची चाहूल लागताच दरोडेखोर तेथून पळून जाण्यात यशस्वी ठरले होते. त्यानंतर त्यांनी आपल्या सीसीटीव्ही कॅमेरे पाहिल्यावर हा प्रकार समजाला होता. त्यावेळी दरोडा घालण्याचा अयशस्वी प्रयत्न सशस्त दरोडेखोर यांचा असल्याचे सीसीटिव्ही फुटेजमधून स्पष्ट होत होते. त्या गुन्ह्यात दाखल असलेले अज्ञात दरोडेखोर यांना पकडण्यासाठी कर्जत पोलिसांनी एक महिना प्रयत्न केले आहेत, मात्र अद्याप दरोडेखोर कर्जत पोलिसांच्या हाती लागले नाहीत.

त्यामुळे कर्जत पोलिसांनी दरोडेखोरांना पकडण्यासाठी मदत व्हावी म्हणून दरोडेखोरांची माहिती दिल्यास ११ हजारांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. याबाबतची माहिती सोशल मीडियावरून जारी केली आहे.

## निवडक

### पत्रकाराने वाचवले वृद्धेचे प्राण



**पनवेल** : खारघर रेल्वेस्थानकातून एक वृद्ध महिला लोकल पकडण्यासाठी चढत असताना त्यांचा तोल गेल्याने त्या खाली पडत होत्या. या वेळी अँकर विलास बडे यांनी प्रसंगावधान दाखवून या महिलेचे प्राण वाचवले. खारघर रेल्वेस्थानकातून ठाणे लोकल पकडण्यासाठी या वृद्ध महिला चढत असताना तोल गेल्याने त्या प्लॅटफॉर्म आणि ट्रेनच्या मधील फटीमध्ये अडकल्या. विलास बडे यांनी क्षणाचाही विलंब न करता त्या वृद्ध महिलेचे प्राण वाचवले. विलास बडे यांनी दाखवलेल्या या तत्परतेचे कौतुक होत आहे.

### सारडेत अज्ञाताने दुचाकी जाळली



**उरण** : सारडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संदिप पाटील यांची दुचाकी शनिवारी (दि. २१) रात्री अज्ञाताने जाळण्याची घटना घडली. सारडे गावात याआधीही कार तसेच दुचाकी जाळण्याची घटना घडली होती. त्या घटनेचा उलगडा न झाल्याने पुन्हा एकदा दुचाकी जाळण्याची घटना घडल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. या घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योगपती मिलिंद ठाकूर, भाजपचे उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांनी घटनेची पाहणी करून निषेध व्यक्त केला, तसेच अशा विघ्नसंतोषी, समाज कंटकाला तत्काळ शासन होणे गरजेचे आहे, अशी मागणी केली आहे.

### नेरूळमध्ये स्वच्छता अभियान



**नवी मुंबई** : नमुंमनपा व माजी नगरसेवक रविंद्र इथापे यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच प्रभागातील नागरिकांच्या सहभागातून वॉर्ड क्र. १००मध्ये स्वच्छता व जनजागृती मोहीम आयोजित करण्यात आली होती. यामध्ये नवी मुंबई मनपाच्या अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, उपायुक्त दादासाहेब चाबुकस्वार, उपायुक्त बाबासाहेब राजळे, स्वच्छता निरीक्षक राजेंद्र सोनवणे, इंगळेसाहेब, निलसिद्धी सोसायटीच्या चेअरमन सरिता बलेरा व पदाधिकारी, भिमाशंकर सोसायटीचे चेअरमन रमेश पवार, खजिनदार संजय चव्हाण व सर्व संचालक, अलकनंदा सोसायटीचे सेक्रेटरी प्रविण बारवे, रायन स्कूलचे अधिकारी, माधवी व लेण्याद्रीचे पदाधिकारी व नागरिकांनी सहभाग घेतला.

## एसजीटी इंटरनॅशनल स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात






(छाया : योगेश पाटील)

### आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन शैक्षणिक धोरण हे शिक्षण क्षेत्रात अमूलाग्र बदल घडविणार असून येणाऱ्या पिढीला त्यांच्या आवडीप्रमाणे शिक्षण घेता येणार आहे. हे काम एसजीटी इंटरनॅशनल स्कूलच्या माध्यमातून होईल, असे प्रतिपादन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी करंजाडे येथे एसजीटी इंटरनॅशनल स्कूलच्या स्नेहसंमेलनावेळी केले.

सावित्री गुलाब तुपे सामाजिक संस्थेच्या करंजाडे येथील एसजीटी इंटरनॅशनल स्कूलचा पहिले वार्षिक स्नेहसंमेलन शनिवारी (दि. २१) ‘आरंभ’ या शिर्षकाखाली आयोजित करण्यात आले होते. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शैक्षणिक वर्षामध्ये विविध स्पर्धा अणि परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या वेळी भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, भाजपचे कर्ण शेलार, ग्रामपंचायत सदस्या प्रिया फडके, शिल्पा नागे, देवकु वाघे, सुषमा मयेकर, मंदार पनवेलकर, एसजीटी इंटरनॅशनल स्कूलचे चेअरमन रमेश तुपे, डायरेक्टर शुभम तुपे, रवींद्र गोवारी, नितीन मुंबईकर, राजेश म्हात्रे, सुनिल वारे, तेजस जाधव यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## पनवेल न्यायालयात पहिले ई-फायलिंग प्रकरण दाखल

**पनवेल : वार्ताहर**

उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ई-फायलिंग सर्वत्र बंधनकारक होणार आहे. त्यामुळे सर्व वकिलांना या पुढील प्रकरणी ही फायलिंगद्वारे दाखल करावी लागणार आहेत. काळाची गरज ओळखून पनवेल येथील न्यायालयाने सकारात्मक पावले उचलत या बदलाचा स्वीकार केला आहे.

न्यायालयीन पद्धत किचकट असल्याने एखादा अर्ज दाखल करण्यासाठीही वेळ लागतो. यावर आता न्यायव्यवस्थेनेच उपाय केला आहे. आता वकील मंडळींना, पक्षकारांना घरबसल्या त्यांची प्रकरणे न्यायालयात दाखल करता येणार आहे. वकील मंडळींना, पक्षकारांना अनेक वेळा न्यायालयात जाता येत नाही. त्यामुळे न्यायालयाचा अवमान होण्याची शक्यता असते. न्यायाधिशांचे खडे बोल ही ऐकावे लागतात, पण आता वकील मंडळींना, पक्षकारांना घरबसल्या प्रकरणे न्यायालयात दाखल करता येतील. न्यायालयांमध्ये ई-फायलिंगद्वारे कामकाजाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे संपूर्ण कामकाज पेपरलेस होईल. ई-फायलिंग या प्रणालीचा बॉम्बे उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

### असे करता येणार रजिस्ट्रेशन

**कोणत्याही पक्षकार, विधिज्ञ, पोलीस, वित्तीय संस्थेला प्रकरणे दाखल करण्यासाठी जिल्हा न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन रजिस्ट्रेशन करता येणार आहे. यासाठी ई-फायलिंगमध्ये जाऊन रजिस्ट्रेशन करता येईल. सध्या वकिलांसाठी न्यायालयाच्या संकेतस्थळावर लिंक दिसत आहे. अन्य व्यक्तींसाठीही ही सुविधा लवकर उपलब्ध होईल.**

### विधिज्ञ, पक्षकारांना करावे लागणार रजिस्ट्रेशन

*प्रकरण दाखल करणारे विधिज्ञ तसेच आपणहून प्रकरणे दाखल करणाऱ्या पक्षकारांना ई-फायलिंगवर रजिस्ट्रेशन करावे लागणार आहे. यासाठी मोबाईल क्रमांक, ई-मेल तसेच विधिज्ञांसाठी त्यांचा महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलकडे रजिस्ट्रेशन करत असतानाचा इनरोल क्रमांक असणे आवश्यक आहे. रजिस्ट्रेशन केलेल्यांनाचा प्रकरणे दाखल करता येणार आहेत. पोलीस, पतसंस्था आदी संस्थानाही स्वत: रजिस्ट्रेशन करता येणार आहे.*

### असे होतील फायदे

*प्रत्येक वेळी न्यायालयात येण्याची गरज नाही, तारीख पुढे ढकलली तर ऑनलाइन समजणार. यामुळे प्रवास खर्चासह वारंवार न्यायालयात येणे, अन्य खर्चाचेही बचत होणार आहे. विरोधी पार्टीच्या वकिलांनी जबाब दाखल करणे स्टेजेस घेतले तर समजून येणार. न्यायालयाने केलेली एखाद्या कागदपत्रावरील ऑर्डर ऑनलाइन पद्धतीने वाचता येणार. समोरच्या विधिज्ञाने दाखल केलेल्या कागदपत्रांचा अभ्यास घरबसल्या करता येणार.*

## प्रत्येक पोलीस ठाण्यात आता महिला सहाय्यता कक्ष

**पनवेल : वार्ताहर, प्रतिनिधी**



पनवेल हद्दीसह नवी मुंबईतील प्रत्येक पोलीस ठाण्यात महिलांना भेडसावणाऱ्या तक्रारीचे निरसन करण्यासाठी महिला सहाय्यता कक्ष सुरू करण्याचा निर्णय नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी घेतला आहे.

बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या नवी मुंबई जिल्हा संघटक सरोज पाटील यांनी याबाबत लेखी मागणी केली होती. त्याला आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १ व परिमंडळ २ या परिमंडळ विभागामध्ये यापूर्वीच महिला सुरक्षा पेट्रोलिंग सुरू करण्यात आली आहे. पेट्रोलिंगसाठी महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस अंमलदार यांची नेमणूक करण्यात येते. या पेट्रोलिंग मोबाईलकडून सार्वजनिक ठिकाणावर महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पेट्रोलिंग केली जाते, तसेच नियंत्रण कक्षाकडून महिलांविषयक प्राप्त तक्रारीस त्वरीत प्रतिसाद दिला जातो. त्याचप्रमाणे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी महिला सहाय्यता कक्ष सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे नागरिकांमधूनही समाधान व्यक्त होत आहे.




सोमवार, २३ जानेवारी २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक १८६
www.ramprahar.com

राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड




# खुल्या गटात करण माळी, ऋतुजा सकपाळ अव्वल




(छाया : भालचंद्र जुमलेदार) अधिक छायाचित्रे पान ६ व ८ वर..




**पनवेल : हरेश साठे**

**रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि खारघर रेसिडन्स वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने व सहआयोजक अदिम जाती मीना विकास असोसिएशनच्या सहकार्याने एक धाव व्यसनमुक्तीसाठी हे सामाजिक हिताचे घोषवाक्य घेऊन रविवारी (दि. २२) झालेल्या खारघर मॅरेथॉनमध्ये तब्बल १७ हजार ८९० स्पर्धकांनी सहभाग घेत उदंड प्रतिसाद दिला. कडाक्याच्या थंडीतही धावपटूंसह हौशी नागरिकांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. स्पर्धेतील पुरुष खुल्या गटात करण माळी, तर महिला खुल्या गटात ऋतुजा सकपाळ यांनी बाजी मारत प्रथम क्रमांक पटकाविला.**






माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे सीईओ व मॅरेथॉन प्रमुख परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मॅरेथॉनने आतापर्यंतच्या सहभागाचे रेकॉर्ड यंदा मोडले. खारघर सेक्टर १९मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथून या स्पर्धेला सकाळी ६ वाजता मान्यवरांच्या हस्ते झेंडा दाखवून प्रारंभ झाला.

या मॅरेथॉनला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार किरीट सोमय्या यांची उपस्थिती लाभली, तर अदिम जाती मीना विकास असोसिएशनचे अध्यक्ष व आयकर विभागाचे अतिरिक्त संचालक विमल कुमार मिना, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, सुप्रसिद्ध बॉलीवूड हास्य अभिनेता राजपाल यादव, सिने अभिनेत्री सई मांजरेकर, अभिनेता प्रसाद मंगेश, खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संदीपान शिंदे, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे यांची प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थिती होती.

सामाजिक व शारीरिक हित जोपासले जात उत्कृष्ट व सुयोग्य नियोजन आणि वेगवेगळ्या सामाजिक संदेशासाठी प्रसिद्ध असलेल्या या स्पर्धेने लोकप्रियतेची शिखरे गाठली आहेत. यंदाचा सहभाग सर्वांत जास्त असल्याने आयोजकांकडून याबद्दल सर्वांचे आभार मानण्यात आले.

या वर्षीची स्पर्धा १३वी होती. स्पर्धा पुरुष खुला गट १० किलोमीटर अंतर, महिला खुला गट १० किमी, १७ वर्षाखालील मुले गट ५ किमी, १७ वर्षाखालील मुली गट ५ किमी, १४ वर्षाखालील मुले गट ५ किमी, १४ वर्षाखालील मुली गट ५ किमी, तसेच खारघर दौड गट ३ किमी आणि सिनिअर सिटीझन दौड २ किमी, पत्रकार गट २ किमी अशा १३ गटांमध्ये झाली. विजेत्या स्पर्धकांना एकूण दोन लाख ९६ हजार रुपये रक्कम स्वरूपात, तसेच मेडल, सर्टिफिकेट आदी बक्षिसे देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे सीईओ व मॅरेथॉन प्रमुख परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजन, स्वागत, प्रसिद्धी, मार्ग नियोजन, प्रवेशिका देणे व घेणे, पंच व नियमावली, फिडिंग व स्पंजिंग, साहित्य, नियंत्रण, मार्ग आखणी, प्रथमोपचार, स्वयंसेवक, बक्षीस वितरण अशा विविध समित्या कार्यरत होत्या. सर्व स्पर्धकांना बिस्किटे, पाणी, ओआरएस एनर्जी ड्रिंक आयोजकांकडून मोफत देण्यात आले. त्याचबरोबर मॅरेथॉनच्या निमित्ताने विविध प्री-इव्हेंट स्पर्धाही आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यातील विजेत्यांचा या वेळी सन्मान करण्यात आला तसेच मोठ्या प्रमाणात सहभाग घेतलेल्या सोसायटी, शाळा व संस्थांचा महासहभाग स्मृतिचिन्हे देऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी मनोरंजनासाठी आयोजित झुम्बा आणि युगांतक रॉक बँडचा स्पर्धक, क्रीडारसिकांनी मनमुराद आनंद लुटला. मॅरेथॉनमध्ये विविध सामाजिक हिताचे संदेश देणाऱ्या सोसायटी, संस्थांचा सहभाग लक्षवेधी होता. त्यांनाही या ठिकाणी गौरविण्यात आले.

स्पर्धेला भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, खारघर रेसिडन्स वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष अमर उपाध्याय, भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी उपमहापौर सीता पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, अनिल भगत, नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, डॉ. अरुणकुमार भगत, अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका अनिता पाटील, नेत्रा पाटील, हर्षदा उपाध्याय, मन्सूर पटेल, दीपक शिंदे, विनोद घरत, मोना अडवाणी, बिना गोगरी, संतोषकुमार शर्मा, श्रीनिवास कोडरू, गीता चौधरी, प्रभाकर जोशी, इर्शाद शेख, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या प्राचार्य राज अलोनी, मॅरेथॉन पंच कमिटीचे प्रभारी सुशिल इनामदार यांच्यासह विविध संस्था, संघटना, भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**(बक्षिसांचा तपशिल पान ५ वर..)**

**मॅरेथॉन म्हणजे फक्त धावणे नसून सर्वांना सोबत घेऊन जाणे आहे. या मॅरेथॉनमध्ये केवळ खारघरच नाही, तर संपूर्ण हिंदुस्थान धावला आहे. सर्वांना एकसंघ आणणे खूप कठीण असते, पण लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांनी ते करून दाखविले. त्यामुळे ही मॅरेथॉन सर्वांना सोबत घेऊन जाणारी ठरली आहे. जगात आपल्या भारताला एक नंबरचा देश करण्यासाठी अर्पण, समर्पण भावना सर्वांनी अंगिकारली पाहिजे.**

**-किरीट सोमय्या, भाजप प्रदेश उपाध्यक्ष**

**रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स खेळ आणि खेळाडूंना नेहमीच प्रोत्साहन देण्याचे काम करीत आहे, तर खारघर रेसिडन्स वेल्फेअर असोसिएशन नागरिकांच्या सूचना ग्राह्य करण्याचे व समस्यांचे निवारण करण्यासाठी कार्यरत आहे. त्याच जोडीने अदिम जाती मीना विकास असोसिएशनने सहभाग घेऊन मॅरेथॉनमध्ये प्रोत्साहन दिले. व्यसनमुक्तीसाठी खारघरवासी उत्स्फूर्त धावले. आपल्या सर्वांना वाटचाल कायम ठेवायची आहे. या मॅरेथॉनमध्ये स्पर्धकांनी आतापर्यंतचे रेकॉर्ड मोडले आहेत. त्याबद्दल मी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.**

**-आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष**

**स्वस्थ, व्यस्त आणि मस्त राहण्यासाठी धावणे गरजेचे असते. मॅरेथॉनच्या रूपाने खारघरमध्ये ऊर्जा निर्माण झाली आहे. उत्तम नियोजन, आयोजन या ठिकाणी भरभरून दिसते. त्यामुळे मी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानतो आणि या भूमीला नमस्कार करतो. याच भूमीतील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने देशातील स्वच्छ, सुंदर शाळा पुरस्काराचा मान मिळवित देशात अव्वल स्थान पटकाविले. मी येथून आपल्यासोबत नाते घेऊन चाललो आहे. त्यामुळे जेव्हा जेव्हा मी या रस्त्यावरून जाईन त्या वेळेला नक्कीच भेट घेत जाईन.**

**-राजपाल यादव, बॉलीवूड हास्य अभिनेता**

**खारघर येथील मॅरेथॉनची एनर्जी पाहून मीसुद्धा प्रेरित झाली आहे. दररोज सकाळी लवकर उठून आपला दिवस चांगला व निरोगी जात असतो. मला खूप आनंद झाला आहे की, मी या स्पर्धेचा घटक म्हणून सहभागी झाले. यासाठी आयोजकांचे आभार आणि सर्व धावपटूंना शुभेच्छा!**

**-सई मांजरेकर, सिने अभिनेत्री**

## निवडक

### पुण्यात मनसे जिल्हाध्यक्षावर गुंडांचा गोळीबार; गुन्हा दाखल

**पुणे** : येथील मनसे जिल्हाध्यक्ष समीर थिगळे यांच्यावर गोळीबार करण्यात आला आहे. राजगुरूनगरच्या सातकरस्थळ येथील राहत्या घरासमोर शनिवारी रात्री हा प्रकार घडला. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मिलिंद जगदाळे आणि मयूर जगदाळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. हे गुंड मोक्कातील आरोपी असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

### इंग्लंडच्या संसदेत खासदाराची पंतप्रधान मोदींवर स्तुतीसुमने

**लंडन** : आंतरराष्ट्रीय वृत्तवाहिनी 'बीबीसी'ने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गुजरातमधील गोध्रा दंगलीबाबत वादग्रस्त माहितीपट प्रसारित केला असताना अशातच ब्रिटीश खासदार लॉर्ड करण बिलिमोरिया यांनी पंतप्रधान मोदींवर स्तुतीसुमने उधळली आहेत. पंतप्रधान मोदी हे पृथ्वीवरील सर्वांत शक्तीशाली व्यक्तींपैकी एक आहेत, असे खासदार बिलिमोरिया यांनी म्हटले. ते इंग्लंडच्या संसदेत बोलत होते.

### वर्ल्डकपमध्ये भारतीय महिलांचा श्रीलंका संघावर मोठा विजय

**केपटाऊन** : महिला अंडर-१९ विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने सुपर-६ सामन्यात मोठा विजय मिळवला आहे. टीम इंडियाने श्रीलंकेचा सात गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेचा संघ २० षटकांत केवळ ५९ धावाच करू शकला. भारतीय संघ या विजयासह संघ उपांत्य फेरी गाठण्याच्या शर्यतीत कायम आहे.

# महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना विजयी करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे शिक्षकांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातील भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या प्रचारार्थ नवीन पनवेल येथील विविध शाळांमध्ये सभांचे आयोजन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या वेळी त्यांनी शिक्षकांशी संवाद साधत म्हात्रे सरांना या निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी करावे, असे आवाहन केले.

या प्रचार सभांना पनवेलच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, स्थायी समितीचे माजी सभापती संतोष शेट्टी, माजी नगरसेवक समीर ठाकूर, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, भापज युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह पदाधिकारी आणि शिक्षक उपस्थित होते.

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीत ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. ते स्वतः शिक्षक असून मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या अडी-अडचणी दूर करण्यासाठी वेळोवेळी धाव घेतलेली आहे. त्यामुळे शिक्षकांची उमेदवार म्हात्रे यांच्याविषयी आपलेपणाची भावना दिसून येते. याचे प्रतिबिंब निकालात पहावयास मिळेल, असा विश्वास त्यांचे समर्थक व्यक्त करीत आहेत. दरम्यान, या निवडणुकीसाठी येत्या ३० जानेवारीला मतदान, तर मतमोजणी २ फेब्रुवारीला होणार आहे.





# ऐन थंडीत राज्यात पावसाचा अंदाज

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात सातत्याने हवामानात बदल होत आहे. कुठे थंडीचा कडाका, तर कुठे ढगाळ वातावरण आहे. या हवामानातील चढ-उताराचा नागरिकांना त्रास होत आहे, तसेच याचा शेती पिकांवरदेखील परिणाम होताना दिसत आहे. अशातच हवामान विभागाकडून २७ जानेवारी ते २ फेब्रुवारीदरम्यान राज्यात पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

राज्यातील मराठवाडा आणि विदर्भात हलका ते मध्यम पावसाची शक्यता आहे. याबाबतची माहिती पुणे हवामान विभागाचे प्रमुख कृष्णानंद होसाळीकर यांनी ट्वीट करून दिली. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे, कारण या पावसाचा पिकांवर परिणाम होण्याची भीती आहे.

# बाळासाहेबांच्या तैलचित्राचे आज विधानभवनात अनावरण

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या तैलचित्राचे सोमवारी (दि. २३) विधानभवन येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते अनावरण होणार आहे. चित्रकार चंद्रकला कदम यांनी हे चित्र साकारले आहे.



विशेष म्हणजे बाळासाहेबांच्या जयंती दिनी होणाऱ्या तैलचित्र अनावरण सोहळ्यास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आदी सर्वपक्षीय उपस्थित राहणार आहेत.

मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या सूचनेनंतर विधानभवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या तैलचित्राचे अनावरणाचा निर्णय विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी घेतला होता. त्यानुसार तैलचित्राचे अनावरण सोमवारी करण्यात येणार आहे.

चार चित्रकारांनी साकारलेल्या बाळासाहेबांच्या चित्रांपैकी चंद्रकला कदम यांच्या चित्राची निवड करण्यात आली. चंद्रकला यांनी आपल्या कलेने चित्रात जिवंतपणा ओतलेल्या या चित्राचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण होणार आहे.

# पुण्यात हिंदूंच्या एकजुटीचे दर्शन; विविध मागण्या

**पुणे : प्रतिनिधी**

जनआक्रोश मोर्चाच्या माध्यमातून रविवारी (दि. २२) पुण्यामध्ये अखिल हिंदू समाजाच्या एकजुटीचे दर्शन घडले. चार वर्षांच्या चिमुरडीपासून ८७ वर्षांच्या आजोबापर्यंत अनेक जणांनी तसेच विविध संस्था, संघटना आणि राजकीय पक्षांनी या मोर्चात उत्स्फूर्त सहभाग घेतला. डोक्यावर भगव्या टोप्या, हातामध्ये भगवे झेंडे, 'जय श्रीराम', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' आणि 'छत्रपती संभाजी महाराज की जय'च्या घोषणा यामुळे वातावरण हिंदूमय झाले होते.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिन म्हणजे फाल्गुन अमावस्या 'धर्मवीर दिन' जाहीर करावा, तसेच लव्ह जिहाद, धर्मांतर आणि गोहत्या यांच्या विरोधात कडक कायदे करून त्यांची अंमलबजावणी व्हावी या प्रमुख मागण्यांसाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती घराण्याचे वंशज आमदार शिवेंद्रराजे भोसले, संत तुकाराम महाराजांचे वंशज शिवाजी महाराज मोरे, हिंदुत्ववादी नेते धनंजय देसाई आणि तेलंगणाचे आमदार राजा सिंह उर्फ राजा भैया यांची मोर्चात प्रमुख उपस्थिती होती.

लाल महाल येथे राजमाता जिजाऊ यांना अभिवादन करून मोर्चाची सुरुवात झाली. त्यानंतर दगडूशेठ हलवाई गणपती येथे आरती केल्यानंतर हा मोर्चा लक्ष्मी रस्तामार्गे डेक्कन जिमखाना येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत आला. तेथे झालेल्या सभेनंतर मोर्चाची सांगता झाली.

## संपादकीय

# खारघर मॅरेथॉनचा डंका

नव्या वर्षाच्या सुरुवातीला धावपटूंसह नागरिकांसाठी पर्वणी असलेली बहुप्रतीक्षित खारघर मॅरेथॉन रविवारी मोठ्या उत्साहात झाली. या स्पर्धेत १७ हजारांहून अधिक जणांनी सहभाग घेत उदंड असा प्रतिसाद दिला. त्यामुळे खारघर नगरीत धावपटूंचा मेळाच भरला होता. एक धाव व्यसनमुक्तीसाठी हा सामाजिक संदेश या स्पर्धेतून देण्यात आला हे विशेष.

**निरोगी जीवनासाठी व्यायाम, कसरत आवश्यक असते. ते करता आले नाही तर किमान धावणे, चालण्यातून तंदुरुस्ती राखता येते. थोडक्यात काय तर शरीरस्वास्थ्य चांगले असले की कोणतेही काम करण्यासाठी उत्साह येतो, तसेच मनही प्रसन्न राहते. हाच आरोग्यविषयक दृष्टिकोन लक्षात ठेवून खारघर मॅरेथॉन दरवर्षी होत असते. गेली दोन वर्षे वैश्विक महामारी कोरोनामुळे या उपक्रमात खंड पडला होता. कोविड-१९ विषाणूच्या संसर्गामुळे संपूर्ण जगभर बराच काळ सर्व काही ठप्प होते, तर लाटा ओसरत असतानाही निर्बंध कायम असल्याने अनेक उपक्रम होऊ शकले नाही, पण यंदा खारघर मॅरेथॉन अक्षरशः रंगली. या मॅरेथॉनला स्पर्धकांसह हौशी नागरिकांचा लाभलेला प्रतिसाद अभूतपूर्व म्हणावा लागेल. रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि खारघर रेसिडन्स वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने व स्पर्धेचे सहआयोजक अदिम जाती मीना विकास असोसिएशनच्या सहकार्याने खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे ही स्पर्धा विविध गटांमध्ये झाली. स्पर्धेसाठी पहाटेच्या वेळी कडाक्याच्या थंडीतही स्पर्धकांचे जथ्थेच्या जथ्थे खारघर नगरीत येत होते. त्याचप्रमाणे या कॉस्मोपॉलिटन शहरातील नागरिक सहकुटुंब, सहपरिवार धावण्यासाठी, तसेच समाजप्रबोधनात्मक संदेश असलेले फलक हाती घेत जनजागृती करण्याकरिता स्पर्धास्थळी दाखल होत होते. सोसायट्यांचे पदाधिकारी, सदस्य, विविध संस्था, संघटना, ग्रुपही वेगवेगळ्या माध्यमातून सामाजिक आशय व्यक्त करीत शिस्तीचे दर्शन घडवित होते. त्यामुळे विविधतेतील एकता या आपल्या भारताच्या संस्कृती व परंपराही यानिमित्ताने पहावयास मिळाल्या. झुम्बा आणि युगांतक रॉक बँडचे कलाकार स्पर्धकांचा उत्साह वाढवित होते, तर सेल्फी पॉइंटवर फोटो काढून उपस्थिती सर्व मंडळी आपला आनंद द्विगुणित करीत होती. समाजिक संदेश हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य आहे. यापूर्वी 'रन अगेंस्ट एड्स', 'पर्यावरणाच्या संरक्षणासाठी धावा', 'एक धाव आरोग्यदायी पनवेलसाठी', 'रन फॉर निर्भय भारत', सद्भावना दौड', 'एक धाव पाणी बचतीसाठी', 'स्त्री-भ्रूणहत्येविरोधात एक धाव', 'एक धाव महिलांच्या सन्मानासाठी', 'रन टू प्रमोट कॅशलेस ट्रान्झॅक्शन', 'हम फिट तो इंडिया फिट' अशी घोषवाक्य घेऊन स्पर्धा झाल्या आहेत. यंदा 'एक धाव व्यसनमुक्तीसाठी' या शीर्षकाखाली स्पर्धा झाली. व्यसनाचे विपरित परिणाम संबंधित व्यक्तीसह त्यांच्या कुटुंबावर होत असतात. ही नशाबाजी जीवावरदेखील बेतू शकते. ते ध्यानात घेता व्यसनमुक्ती काळाची गरज आहे आणि हेच खारघर मॅरेथॉनमधून अधोरेखित करण्यात आले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आणि पदाधिकारी, कार्यकर्ते, निरनिराळ्या समित्यांचे स्वयंसेवक, नागरिक, धावपटूंच्या सहभागाने ही मॅरेथॉन यशस्वी झाली.**

# कलाकारांची खाण, चित्रकारांचे माहेरघर : कर्जत




**खबरबात**
विजय मांडे

कर्जत तालुका जसा शिक्षण पंढरी म्हणून ओळखला जातो तसाच धबधब्यांचे गाव, फार्महाऊसची संस्कृती स्वीकारलेले गाव, बटाटावड्यासाठी प्रसिद्ध असलेले गाव, कलाकारांचे गाव म्हणूनही ओळखला जातो. तालुक्यातील अनेक गावांमध्ये अगदी दुर्गम आदिवासी भागातसुद्धा चित्रकार आहेत. अगदी साधा शेतकरी, मच्छी व्यावसायिक, चिक्की व्यावसायिक ते दगड खाण चालविणारासुद्धा चित्रकार या मातीत तयार झाला आहे. या साऱ्यांची चित्रे मुंबई, पुणे नव्हे तर सातासमुद्रापार गेली असून अजूनही जात आहेत. यामधील काही चित्रकार हुबेहूब रंगवली साकारण्यातसुद्धा प्रसिद्ध आहेत.

कर्जत ही कलाकारांची भूमी आहे. कला शिक्षक शांताराम दगडे, द. ना. गोखले आणि राघो पवार यांच्यामुळे चित्रकलेचे महत्त्व कर्जतकरांना कळले. वैजनाथच्या चक्रदेव सरांचासुद्धा यामध्ये सहभाग आहे. नव्या पिढीने ही कला सातासमुद्रापार नेऊन ठेवली आहे. पराग बोरसे या चित्रकाराने खऱ्या अर्थी वास्तववादी चित्रे साकारून परदेशी नागरिकांनाही आपल्या चित्रांची भुरळ घातली. त्यानंतर सातवी पास असलेला हरी फुलावरे, दगडाच्या खाणीत अडकलेला राजेंद्र दगडे, चिक्की व्यवसाय करणारा सुनील परदेशी, मासळी व्यवसायिक किसन खंडोरी, विवेक वडकर, रामदास लोभी, प्रभाकर रुठे, प्रदीप घाडगे, सचिन सावंत, प्रकाश पटवर्धन, मनोज देशमुख, मिहीर मोकल, कुणाल साळवी आणि महिला चित्रकार अश्विनी बोरसे व हर्षला कडू या चित्रकारांनी मुंबई, पुण्यात चित्रप्रदर्शनांचे आयोजन करून कर्जत हे कलाकारांची खाण आहे हे जगाला दाखवून दिले. अनिल मोरे हेसुद्धा चित्रे रेखाटत असत, मात्र चित्रांपेक्षा त्यांच्या विविध विषयांवरील रांगोळ्या खूप बोलक्या असत. कर्जतच्या काही चित्रकारांना जगप्रसिद्ध चित्रकार पराग बोरसे याचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले म्हणूनच त्यांची कला खऱ्या अर्थाने विकसित झाली.

जहांगीर आर्ट गॅलरीबरोबरच नेहरू तारांगण आदी ठिकाणी त्याची चित्र प्रदर्शने भरू लागली. नेहरू तारांगण येथे दरवर्षी आर्ट फ्युजन शो आयोजित केला जातो. भारतातील अनेक प्रसिद्ध ज्येष्ठ चित्रकारांच्या चित्रांबरोबर परागची तीन चित्रे तेथे प्रदर्शित केली. हा त्याचा आयुष्यतला सर्वात मोठा बहुमान होता. त्याला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. भारतात मानाचा समजला जाणार 'पंडित सातवडेकर पुरस्कार' त्याला मिळाला. त्यावेळी त्याला जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटले होते. त्यानंतर त्याला अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्याची अनेक चित्रे त्याला भारतीय दुतावास, डब्लिन, आयर्लंड यांनी कला आणि मानवी चेतना या विषयावर व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले आहे. बोरसे यांना व्याख्यानासाठी आयर्लंडचे निमंत्रण म्हणजे ही बाब कर्जतकरांसाठी अभिनंदनीय आहे.

अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या दोन देशांमधून प्रसिद्ध होणाऱ्या इंटरनॅशनल आर्टिस्ट मॅक्झिन यांच्या रिफ्लेक्शन इन रिपल्स या निसर्गचित्राची जगातील तेरा उत्कृष्ट निसर्ग चित्रांमध्ये निवड केली आणि या मॅक्झिनमध्ये त्यांच्यावर एक लेखही प्रसिद्ध झाला आहे. पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका या संस्थेने त्यांच्या ४८व्या आंतरराष्ट्रीय वार्षिक चित्र प्रदर्शनासाठी पराग बोरसे यांच्या चित्राची निवड केली होती. सलग तीन वेळा या संस्थेमध्ये चित्र निवड झालेले पराग बोरसे हा एकमेव भारतीय ठरला आहेत. अमेरिकेतून प्रसिद्ध होणाऱ्या पेस्टल जर्नल या मॅक्झिनने पराग बोरसे याला व्यक्ती चित्रणासाठीचा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार देऊन सन्मानित केले. न्यूयॉर्कमधील पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका या आंतरराषट्रीय कला-संस्थेकडून 'सिग्नेचर मेंबर' म्हणून निवड करण्यात आली आहे. हा सन्मान मिळवणारा पराग हा पहिला भारतीय चित्रकार ठरले आहेत.

प्रसिद्ध चित्रकार रवी परांजपे यांच्यासारखा गुरू मिळालेल्या पराग बोरसे याच्या चित्रांची भुरळ सामान्य माणसे, परदेशी रसिक यांच्याबरोबरच राजकारणी लोकांनाही आहे. खासदार शरद पवार, छगन भुजबळ, सुप्रिया सुळे, श्रीनिवास पवार यांनाही परागची चित्रे मनापासून आवडतात. गृहमंत्री दि. आर. आर. पाटील यांनासुद्धा त्याची चित्रे आवडत असत. या सर्वांच्या निवासस्थानी त्याची चित्रे आहेत. असा हा कोहिनूर हिरा कर्जतच्या कोंदणात आहे. त्याच्या चित्रांचे फेब्रुवारी महिन्यात मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत प्रदर्शन आहे.

विशेष म्हणजे हरी फुलावरे हा अगदी साधा सातवी पास असलेला शेतकरी घरातील आहे. पराग बोरसे जेव्हा त्याच्या बीड बुद्रुक गावातील शेतावर जाऊन निसर्गचित्रे काढण्यास जात होता, त्यावेळी हरी तो काढत असलेली चित्रे कुतूहलाने पाहत असे. परागला पाणी आणून दे तर कधी चहा आणून दे असे निमित्त करून हरी पराग काढीत असलेली चित्रे न्याहळत होता. हळूहळू त्याला गोडी लागली व तोसुद्धा चित्रे काढू लागला. एकलव्याप्रमाणे हरिने परागला गुरू मानले. परागने जेव्हा हरीने काढलेली चित्रे पहिली तेव्हा त्याच्या तोंडून अरे वा असे शब्द आले. त्यानंतर त्यांची मैत्री घट्ट झाली आणि परागने हरीला चित्रे काढण्याचे धडे द्यायला सुरुवात केली आणि हरीची चित्र प्रदर्शने मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये झळकू लागली. त्याची चित्रे परदेशातील चित्र रसिकांच्या घरीसुद्धा आहेत.

'सुनील चिक्की' हा वडिलोपार्जित व्यवसाय सांभाळत सुनीलने आपली चित्रकला जोपासली त्याची चित्र प्रदर्शनेदेखील मुंबई, पुण्यासारख्या शहरात आयोजित केली जातात. अनेक जण त्याची चित्रे घेण्यासाठी त्याच्या कर्जतच्या निवासस्थानी येत असतात. त्यामध्ये अनेक परदेशातील चित्र रसिकही असतात. सुनीलची देखील न्यूयॉर्कमधील पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका या आंतरराष्ट्रीय कला संस्थेकडून सिग्नेचर मेंबर म्हणून निवड करण्यात आली आहे. हा सन्मान मिळवणारा भारतातील दुसरा चित्रकार ठरला आहे. सुनील रंगवलीसुद्धा अतिशय चांगली काढतो. त्याने दहा-बारा वर्षांपूर्वी काढलेली इंदिरा गांधी यांची रांगोळी भलतीच लोकप्रिय झाली होती. किसन खंडोरी हा मच्छी व्यवसायिक असून त्यानेसुद्धा आपली चित्रकला विकसित केली आहे. किसनसुद्धा रंगवली साकारण्यात प्रसिद्ध आहे. दगडाची खाण सांभाळताना चित्रकलेकडेही तितकेच लक्ष देणारा राजेंद्र दगडेसुद्धा खूप मेहनती आहे. तो सुद्धा रंगवली अतिशय चांगली साकारतो. त्याचे चित्रप्रदर्शन नुकतेच मुंबईत पार पडले. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला होता.

बीड बुद्रुक येथील उदयोन्मुख चित्रकार रामदास शंकर लोभी याचे 'द अन् टोल्ड स्टोरी' हे चित्र प्रदर्शन मुंबईतील नेहरु सेंटरमधील आर्ट गॅलरीमध्ये आयोजित करण्यात आले होते. सिंगापूर येथे चित्र प्रदर्शन झाले होते. रामदास लोभी यांच्या चित्रांचे वैशिष्ठ्य म्हणजे भारतीय कला संस्कृती आणि उत्सवाचे महत्त्व पटवून देणारे असून त्यांची चित्रे मनाला मोहून टाकणारी आहेत. त्यांचे प्राथमिक कला शिक्षण खोपोली कला महाविद्यालयात तर उच्च कला शिक्षण अभिनव कला महाविद्यालय, पुणे येथे झाले आहे. त्यांची अनेक चित्र प्रदर्शने भारतात झाली असून वैयक्तिक प्रदर्शने मुंबई, पुणे, बँगलोर येथे झाली आहेत. त्याचे सिंगापूर येथेही चित्रप्रदर्शन झाले असून त्यानंतर तो इंन्डोनेशिया बाली येथील कला संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी गेला होता. अशी चित्रकारांची खाण असलेल्या कर्जतमध्ये अनेक चित्रकार तयार होत आहेत. ही कर्जतकरांसाठी अभिमानास्पद बाब आहे.

# स्वातंत्र्यसेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस



**निमित्त**

नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील नेते होते. नेताजी असे त्यांना प्रथम १९४२च्या सुरुवातीस जर्मनीमध्ये भारतीय सैनिकांनी आणि बर्लिनमधील भारताच्या विशेष ब्यूरोमधील जर्मन आणि भारतीय अधिकाऱ्यांनी म्हणायला सुरू केले.

सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशामधील कटक शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जानकीनाथ आणि आईचे नाव प्रभावती होते. जानकीनाथ बोस हे कटक शहरातील नामवंत वकील होते, तसेच बंगालचे विधानसभेचे सदस्य ही होते. इंग्रज सरकारने त्यांना रायबहादूर हा किताब दिला होता. प्रभावती व जानकीनाथ बोस यांना एकूण १४ मुले होती. सुभाषचंद्र त्यांचे सहावे अपत्य व पाचवे पुत्र होते.

लहानपणी, सुभाष कटकमध्ये रॅवेन्शॉ कॉलिजिएट हायस्कूल नामक शाळेत शिकत होते तेव्हा त्यांचे एक शिक्षक वेणीमाधव दास आपल्या विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचे स्फुल्लिंग जागवत. वयाच्या १५व्या वर्षी, सुभाष गुरूच्या शोधात हिमालयात गेले हाते. गुरूचा हा शोध असफल राहिला. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचून, सुभाष त्यांचे शिष्य बनले. कोलकात्त्यातील प्रेसिडेंसी महाविद्यालयात इंग्रज प्रा. ओटेन हे भारतीय विद्यार्थ्यांशी उर्मटपणे वागत असत. म्हणून सुभाषने महाविद्यालयात संप पुकारला होता. १९२१ साली इंग्लंडला जाऊन, सुभाष भारतीय नागरी सेवेच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले, परंतु इंग्रज सरकारची चाकरी करण्यास नकार देऊन त्यांनी राजीनामा दिला व ते मायदेशी परतले. कोलकात्त्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, देशबंधू चित्तरंजन दास यांच्या कार्याने प्रभावित झालेल्या सुभाषची, दासबाबूंबरोबर काम करण्याची इच्छा होती. इंग्लंडहून त्यांनी दासबाबूंना पत्र लिहून, त्यांच्याबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती.

रविंद्रनाथ ठाकूर यांच्या सल्ल्यानुसार भारतात परतल्यानंतर ते सर्वप्रथम मुंबईला जाऊन महात्मा गांधींना भेटले. मुंबईत गांधीजी मणिभवन नामक वास्तूमध्ये वास्तव्य करत. तेथे २० जुलै १९२१ रोजी महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले. गांधीजीनीदेखील कोलकत्याला जाऊन दासबाबूंबरोबर काम करण्याचा सल्ला दिला. मग सुभाषबाबू कोलकात्त्याला आले व दासबाबूंना भेटले. दासबाबूंना त्यांना पाहून फार आनंद झाला. त्याकाळी, गांधीजींनी इंग्रज सरकारच्या विरोधात असहकार आंदोलन चालवले होते. दासबाबू बंगालमध्ये या आंदोलनाचे नेतृत्व करीत होते. त्यांच्याबरोबर सुभाषबाबू या आंदोलनात सहभागी झाले.

१९२२ साली दासबाबूंनी स्वराज पक्षाची स्थापना केली. विधानसभेच्या आतून इंग्रज सरकारला विरोध करण्यासाठी, कोलकाता महापालिकेची निवडणूक, स्वराज पक्षाने लढवून, जिंकली. स्वतः दासबाबू कोलकत्त्याचे महापौर झाले. त्यांनी सुभाषबाबूंना महापालिकेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी बनवले. सुभाषबाबूंनी आपल्या कार्यकाळात महापालिकेची कामे करण्याची पद्धतच बदलून टाकली. कोलकत्त्यातील रस्त्यांची इंग्रज नावे बदलून, त्यांना भारतीय नावे दिली गेली. स्वातंत्र्यलढ्यात प्राणार्पण केलेल्या क्रांतिकारकांच्या कुटुंबीयांना महापालिकेत नोकरी मिळू लागली. सुभाषबाबू देशातील एक अग्रेसर युवा नेता म्हणून ओळखले जाऊ लागले. आपल्या सार्वजनिक जीवनात सुभाषबाबूंना एकूण अकरा वेळा कारावास भोगावा लागला.

१९९२ साली नेताजी सुभाषचंद्र बोस यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्यात आले होता, परंतु सुप्रीम कोर्टात दाखल केलेल्या एका जनहितयाचिकेचा आधार घेऊन नेताजींना दिलेला हा पुरस्कार परत काढून घेण्यात आला. त्या याचिकेत नेताजींच्या मृत्यूचा कुठलाही पुरावा उपलब्ध नसल्याने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देणे अवैध आहे, असा युक्तिवाद करण्यात आलेला होता. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाने नेताजींना देण्यात आलेला हा पुरस्कार परत घेण्यात आला. दिलेला भारतरत्न पुरस्कार परत घेण्याची इतिहासातील ही एकमेव घटना आहे.

**-साभार विकीपिडीया**

## बदलते तंत्रज्ञान



# इंस्टाग्राम वापरताना सावधगिरी बाळगा!

काही काळापासून भारतात सेक्सटॉर्शनचे बरेच प्रकार समोर आले आहेत. इंस्टाग्रामवरही सध्या असेक काही प्रकार घडत असल्याचं समोर येत आहे. इथे मोठ्या संस्ख्येत सेक्सबोट्स आहेत जे लोकांची पर्सनल डीटेल्स चोरतात. जर तुम्हीही इंस्टाग्राम युजर असाल तर आताच सावध व्हा. हा संपूर्ण प्रकार समजून घ्या.



सोशल मीडियावर स्पॅम, फ्रॉड्स आणि एक्स्टॉर्शनचे प्रकार सतत समोर येत असतात, पण सध्या असे प्रकार इंस्टाग्रामवर होत आहेत. काही प्रकरणांत असे समोर आले आहे की, इंस्टा स्टोरी सेक्सबॉट्सकडून लाइक केली जात आहे. हे ऐकायला जरी सामान्य वाटत असले तरी याचे परिणाम गंभीर होऊ शकतात.त्यासाठी सगळ्यात आधी हे सेक्सबॉट काय प्रकार आहेत हे समजून घेणे आवश्यक आहे. सेक्सबॉट असे अकाउंट असते ज्यात लोकांना फसवण्यासाठी अश्लील फोटो लावलेला असतो.

या अकाउंट्सच्या बायोमध्ये फिशिंग लिंक मिळू शकते. हे अकाउंट्स तुम्हाला रँडमली फॉलो करतात. इतरांच्या तुलनेत ते तुमच्या इंस्टा अकांउंटवर, आयडीवर जरा जास्त लक्ष ठेवून असतात.

**लोकांच्या डिटेल्ससाठी बॉट्स** : मागच्या वर्षी २०२२च्या शेवटी बऱ्याच लोकांनी हे नोटीस केलं असेल की, त्यांची इंस्टाग्राम स्टोरी बऱ्याच नवनवीन लोकांनी बघितली आहे. त्या युजर्सचे इंस्टा अकाउंट पब्लिक होते. ते चेक केल्यावर समजले की, हे अकाउंट सेक्सबॉट्स आहे. अशाप्रकारचे अकाउंट्स सोशल मीडियावर असणे नवीन नाही. अनेक वर्षांपासून असे अकाउंट्स आहेत. ते सध्या इंस्टाग्रामवर लोकांना आपल्या जाळ्यात ओढण्याचे काम करत आहेत.

**कसे वाचू शकाल?**

* बरेचसे लोक सेक्सबॉटला गांभीर्याने घेत नाहीत. त्यांना यांचे पोस्ट फनी वाटतात. शिवाय त्यांच्याकडून येणाऱ्या एंगेजमेंटमुळे लोक यांना सहज इग्नोर करतात.
* काही वेळा हे सेक्सबॉट लोकांना महिलांचे फोटो पाठवतात. यात आर रेटेड कार्टूनचे मेसेज पण असतात.
* काही मेसेजमध्ये फिशिंग लिंक असतात. कोणी त्यावर क्लिक केलं तर त्याच्याकडून पर्सनल डिटेल्स मागितले जातात.अशाप्रकारे अडकवून एक्सटॉर्शन केले जाते.
* जर तुम्हाला यापासून वाचायचे असेल तर अकाउंट पर्सनल ठेवा.

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : यंदा थंडी जास्त असल्याने सी-गल पक्ष्यांनी समुद्रकिनारी गर्दी केली आहे. मासेमारीसाठी जाणाऱ्या होड्यांवर घिरट्या घालून मासे मिळतात का याची संधी शोधत असणारे हे पक्षी छायाचित्रात दिसत आहेत.** (छाया : संजय करडे)

## आरोग्य प्रहर



# दूध पिण्याची योग्य वेळ ठरते फायदेशीर

लहान मुलांसह मोठ्यांनादेखील दररोज दूध पिण्याचा सल्ला दिला जातो कारण दूध निरोगी राहण्यासाठी मदत करते. दुधात भरपूर प्रमाणात कॅल्शियम आढळते. कॅल्शियमसह दुधात अनेक पोषकतत्त्वे देखील आढळतात. लहान मुलांची हाडे मजबूत व्हावी यासाठी त्यांनी दररोज किमान एक ग्लास दूध पिण्याचा सल्ला दिला जातो, पण नेमक्या कोणत्या वेळी दूध प्यावे, ज्यामुळे आरोग्यासाठी ते अधिक फायदेशीर ठरेल याबाबत अनेकांना शंका असते. लहान मुले, तरुण मंडळी, वयस्कर व्यक्तींनी वयानुसार कोणत्या वेळी दूध प्यावे जाणून घेऊया...

**लहान मुले** : लहान मुलांनी सकाळी दूध प्यावे. तुम्ही मुलांना फुल क्रीम दूध देऊ शकता. यामुळे त्यांची दिवसभरातील कॅल्शियमची गरज पूर्ण होईल. तसेच सकाळी दूध प्यायल्याने मुलांना भरपुर ऊर्जा मिळेल, ज्यामुळे त्यांना दिवसभर थकवा जाणवणार नाही.

**तरुण व्यक्ती** : तरुणांनीदेखील सकाळच्या वेळी दूध प्यावे. अनेक तरुणांना सकाळच्या वेळी व्यायाम, योगा करण्याची सवय असते. ज्यामुळे शरीराला ऊर्जेची गरज भासते. ही ऊर्जेची गरज दुधामुळे पूर्ण होऊ शकते, तसेच दिवसभरातील कामे पूर्ण करण्यासाठीही त्यांना ऊर्जा मिळेल.

**वयस्कर व्यक्ती** : वयस्कर व्यक्तींनी संध्याकाळच्या वेळी दूध प्यावे. अनेक वयस्कर व्यक्तींना अपचनाचा त्रास असतो, ज्यामुळे त्यांना दूध पचायला जड जाऊ शकते. जर त्यांनी सकाळी दूधाचे सेवन केले तर त्यांना दिवसभर जड वाटू शकते. त्यामुळे त्यांनी संध्याकाळी दूध पिणे फायदेशीर ठरेल.

काही व्यक्तींना रात्री झोपण्यापूर्वी दूध पिण्याची सवय असते. ज्या व्यक्तींना रात्री झोप न लागण्याची समस्या सतावते, त्यांच्यासाठी ही सवय फायदेशीर ठरू शकते. झोपण्याआधी दूध प्यायल्याने ट्रिप्टोफॅन नावाचे अमिनो ॲसिड रिलीज होते, ज्यामुळे शांत झोप लागण्यास मदत मिळते.

(येथे देण्यात आलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे. अधिक माहितीकरिता तज्ज्ञांचा सल्ला घ्या.)

# कर्जत नांदगाव येथील शेतकऱ्याचा देवदेवस्कीतून खून; दोघांना अटक

## पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह पोत्यात भरून टाकला विहिरीत



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायतमध्ये भोमळवाडी जवळ असलेल्या पाझर तलावाच्या कडेला असलेल्या विहिरीत मृतदेह आढळून आला आहे. चिंचवाडी गावातील संबंधित शेतकऱ्याचा खून करून पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह पोत्यात भरून त्या पोत्यात दगड भरून नळपाणी योजनेच्या मृतदेह विहिरीत टाकला होता. वृध्द शेतकऱ्याचा खून देवदेवस्कीच्या कारणासाठी केला गेला असल्याचा संशय असून याबद्दल पोलिसांकडून तपास सुरु आहे. पोलिसांनी या प्रकरणी दोघांना अटक केली आहे. त्यांना न्यायालयाने २७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

कर्जत तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायतमध्ये चिंचवाडी हे गाव आहे. या गावातील शेतकरी शरद लक्ष्मण गोसावी यांचा मृतदेह २० जानेवारी रोजी भोमलवाडी येथील पाझर तलावाच्या खाली असलेल्या नळपाणी योजनेच्या विहिरीत आढळून आला होता. त्या तलावाच्या खाली असलेल्या विहिरीत गोणपाटचे पोते तरंगत पाण्यावर आले असल्याचे नळपाणी योजना सांभाळणाऱ्या व्यक्तीला दिसून आले. त्यानंतर संबंधित पोत्यात मृतदेह असल्याने पोलिसांना पाचारण करण्यात आले.

नेरळ पोलीस ठाणे यांच्याकडून पोलीस उपअधीक्षक विजय लगारे यांना माहिती देण्यात आली. त्यानंतर उपअधीक्षक आणि पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांच्या पथकाने पंचाच्या समक्ष मृतदेह बाहेर काढला. त्यावेळी चिंचवाडीमधील ५५ वर्षीय शरद लक्ष्मण गोसावी यांचा तो मृतदेह असल्याचे निष्पन्न झाले. खून करणाऱ्या व्यक्तीने पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह पोत्यात भरून तो मृतदेह विहिरीत टाकला. परंतु मृतदेह ज्या पोत्यात भरून नळपाणी योजनेच्या विहिरीमध्ये टाकला होता. त्या पोत्यात मोठ मोठे दगड देखील टाकण्यात आले होते. त्यामुळे पुरावे नष्ट करण्यासाठी असा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले आहे. मृतदेह किमान तीन दिवस आधी खून करून विहिरीत टाकला असावा असा पोलिसांचा अंदाज आहे तर मृतदेह पाण्यात फुगल्याने तो तरंगला आणि त्यामुळे पाण्याच्यावर आल्याची माहिती मिळाली आहे.

पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. अज्ञात व्यक्ती विरूध्द नेरळ पोलिसांनी ०८ / २०२३ खाली भादवी कलम ३०२ आणि २०१खाली गुन्हा दाखल असून या खुनाच्या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर करीत आहेत. त्यावेळी पोलिसांनी केलेल्या तपासात दोघांना पोलिसांनी संशयित म्हणून आधी चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यावेळी त्या दोघांनी आपणच शरद गोसावी यांचा खून केला असल्याचे कबूल केले आहे. चिंचवाडी गावातील रहिवाशी अरुण गणपत गोसावी – ४० आणि शंकर धोंडू वाघमारे – ३५ आणि एक अशा तिघांनी मिळून त्याच वाडीमधील समाज मंदिरामध्ये मृतदेह पोलिसांच्या हाती लागायच्या सहा दिवस आधी रात्री झालेल्या भांडणाच्या वेळी मारहाण केली आणि नंतर सकाळी धारदार शस्त्राने पोटात वार करून शरद गोसावी यांचा खून केला. त्यानंतर त्या तिघांनी मृतदेह पहाटे अंधारात गावाच्या बाहेर नेला आणि पाझर तलावाच्या खाली भोमलवाडी येथील नळपाणी योजनेच्या उध्दभव विहिरीमध्ये टाकून दिला. पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह गोणपाटाच्या पिशवीत भरून त्यात दगड टाकून ते पोते विहीरीत टाकले होते.

### पोलीस तिसऱ्या आरोपीच्या शोधात

**या दोन्ही आरोपीना कर्जत न्यायालयात हजर केले असता न्यायायलाने शरद गोसावी यांच्या खून प्रकरणी अरुण गोसावी आणि शंकर वाघमारे या दोघांना २७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. आता पोलिसांना त्या तिसऱ्या आरोपीपर्यंत पोहचून खुनाच्या गुन्ह्याची उकल करायची असून त्या तिसऱ्या आरोपीच्या शोधासाठी पोलिसांचे पथक रवाना करण्यात आले आहे.**

# प्रत्येक तालुक्यात वैद्यकीय आरोग्य महाशिबिर भरविणार –सुरेश मगर

### रोह्यात ओबीसी जनमोर्चाची जिल्हा कार्यकारिणी बैठक यशस्वी



**रोहा : प्रतिनिधी**

ओबीसी बहुजन समाजासाठी ओबीसी जनमोर्चा काम करीत असून ओबीसी समाजाच्या हिताच्या दृष्टीकोनातून ओबीसी समाज बांधवांसाठी रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात वैद्यकीय आरोग्य महाशिबिर भरविणार असल्याचे रोह्यातील कुणबी समाज सभागृहात ओबीसी जनमोर्चा जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत जिल्हाध्यक्ष सुरेश मगर यांनी सांगितले.

यावेळी उपाध्यक्ष सुदाम शिंदे,प्रदुम्भ ठसाळ, महीला अध्यक्ष अक्षरा कदम,युवक अध्यक्ष निलेश थोरे, जिल्हा सरचिटणीस अशोक पाटील, रवी देवकर, संतोष खटावकर, सचिन कदम, सुरेश पाटील, अनंत थिटे, दिलीप पाटील, कृष्णा भोसले, महेश बामुगडे, सुहास खरीवले, अरविंद मगर, मोरेश्वर खरीवले, विकास खांडेकर, महेश तुपकर आदी उपस्थित होते.

या बैठकीत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात वैद्यकीय आरोग्य महाशिबीर ओबीसी जनमोर्चाच्या माध्यमातून राबविण्यात येणार असल्याचे ठरविण्यात आले. जिल्ह्यातील १० तालुक्यात ओबीसी जनमोर्चा ची संघटनी बांधणी झाली असून येत्या दोन महीन्यात ओबीसी जनमोर्चा ची संघटना उर्वरित तालुक्यात गठीत करण्यात येणार असल्याचे ठरविण्यात आले. यासह युवक व महीला संघटना बांधणी करण्यात येणार असल्याचे ठरविण्यात आले. जिल्हयाचा ओबीसी जनमोर्चाचे अलिबाग येथे आंदोलन यशस्वी करण्यात आल्याने यासाठी प्रयत्न व सहकार्य करणाऱ्यांचे यावेळी आभार मानण्यात आले.

युवकांसाठी शासनाच्या विविध योजना व विद्यार्थ्यांना शासनाच्या सवलती मिळवून देण्यासाठी प्रयत्न ओबीसी जनमोर्चा च्या वतीने करण्यात येणार आहे. यासह संघटनात्मक बांधणी, ओबीसी जनमोर्चा च्यावतीने समाज बांधवांचे विविध समस्या, अडचणी, युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे यावेळी ठरविण्यात आले. यावेळी तळा तालुका प्रसिद्ध प्रमुख कृष्णा भोसले यांची निवड करण्यात आली असून निवडीचे पत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

# रेशनिंग दुकानातील निकृष्ट दर्जाचा तांदूळ हटवण्याची मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत मोफत अन्नधान्य जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ पर्यंत मोफत धान्य दिले जात आहे. रेशनींग दुकानातून हे धान्य लोकांना मोफत वाटप केले जात असते. परंतु नांदगाव येथील ग्राम पंचायत जवळ असणाऱ्या रेशनींग दुकानातून निकृष्ठ दर्जाचा तांदूळ पुरविला जात असल्याने येथील ग्रामस्थ हैराण झाले आहेत. हा तांदूळ मळका तसेच असंख्य खडे असणारा तांदूळ हा लोकांच्या आरोग्यसाठी घातक असून या दुकानातील तातडीने तांदूळ हटवण्यात यावा, अशी मागणी मुरुड तालुका भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष स्वप्नील श्याम चव्हाण यांनी केली आहे. याबाबत त्यांनी रायगड जिल्हाधिकरी याना मेल पाठवून याबाबत आपली कैफियत मांडली आहे.

चव्हाण यांनी सांगितले, अनेक दिवसापासून या दुकानातून खराब तांदूळ लोकांना दिला जात आहे. त्यामुळे लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. मुरुड तहसीलदारांनी दुकानाला भेट देऊन खराब तांदूळ उचलून नेऊन लोकांना दिलासा द्यावा अशी मागणी केली आहे.

नांदगाव येथील रास्त भाव धान्य दुकानातून जे धान्य निकृष्ठ दर्जाचे आहे ते तातडीने ताब्यात घेऊन त्या बदल्यात चांगले धान्य देण्यात यावे अशी मागणी यावेळी स्वप्नील चव्हाण यांनी केली आहे.

# मुरूडच्या महाविद्यालयात ऊर्जा बचत आणि घनकचरा व्यवस्थापन प्रशिक्षण



**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा विज्ञान महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष व पेट्रोकेमिकल कन्झर्वेशन रिसर्च असोसिएशन, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी वैकल्पिक ऊर्जा स्रोत, बायोडिझेल, घन कचरा व्यवस्थापनावर आधारित प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

प्रशिक्षणासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे येथील विद्युत अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. नितीन एस. लिंगायत उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्रा. अल्ताफ फकीर, प्रा. फिरोज शेख व सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांमध्ये आयेशा टाके, अय्यान सोंडे, क्रिपा धुमाळ, ऋतिका माळी, सानिका बिरवाडकर यांनी प्रयत्न केले.

# कर्जतमध्ये भवानी माता मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नसरापूर ग्रामपंचायती मधील चिंचवली गावातील भवानी मातेच्या मंदिराचा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात पार पडला.

भवानी मातेच्या मंदिराचा वर्धापन दिनानिमित्त अनेक धार्मिक आणि आध्यत्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात निवृत्तीमहाराज शिंदे, यशमहाराज बडेकर, मनोहरमहाराज शिंदे, शंकरमहाराज म्हसे, रमेश महाराज श्रीखंडे, पांडुरंग महाराज हडप, सौरभ महाराज शिंदे, जयराम महाराज हडप, ज्ञानेश्वर महाराज रुठे यांच्या उपस्थिती हरिपाठ सोहळा झाला. तर रायगड भूषण ह.भ.प. रामदास महाराज पाटील यांचे सुश्राव्य असे कीर्तन झाले. त्यात कीर्तनसेवेला ध्यात्मिक गुरुकुल शिक्षण संस्था महड यांची साथ लाभली. त्याचबरोबर मदन महाराज पाटील आणि आजूबाजूच्या परिसरातून आलेल्या वारकरी वर्गाची देखील कीर्तनसेवेला साथ मिळाली. रात्रीचे जागर भजन गायक विक्रममहाराज थोरवे, मृदंगमनी मनोज महाराज दाभणे यांचे भजन झाले.

जेष्ठ ग्रामस्थ काशिनाथ (बाबा) जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ ॲड. संपत हडप, संभाजी राऊत, प्रवीण पाटील, विजयमहाराज हडप, सचिन हडप, अजय जाधव, अतुल हडप, सुरज जाधव, मनोज जाधव, ओमकार तिखंडे, मंगेश जाधव, अक्षय तिखंडे, ज्ञानेश्वर. देवघरे, देविदास तिखंडे, नरेश जाधव, हरेष जाधव, प्रमोद तिखंडे, नितेश तिखंडे त्याच बरोबर श्रीराम मित्र मंडळ आणि जय भवानी मंडळ यांनी आयोजन केले होते.



# मालमत्ता करवाढ : कर्जतकरांच्या एकजुटीचा विजय



### आंदोलन तूर्त स्थगित

**नगर परिषदेने अनेक करांसाठी वरिष्ठ कार्यालयाच्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. आपले २६ जानेवारीपासूनचे आंदोलन तूर्तास स्थगित केले आहे. कार्यवाही आपल्याला पटली नाही तर पुन्हा आंदोलनाचे हत्यार आपण उचलू, असे स्पष्ट केले. दीपक लाड यांनी 'आपले घर किंवा दुकान काही काळ बंद असल्यास त्याची कर आकारणी कमी होऊ शकते.' असे सांगितले. नंदन भडसावळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.**

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषदेने शहरातील वीस हजार नागरिकांना मालमत्ता करवाढीबाबत चतुर्थ वार्षिक करवाढसाठी नोटिसा पाठवल्या आहेत. त्याविरुद्ध कर्जतकर नागरिक आक्रमक झाले असून त्यांनी एकत्रितपणे आम्ही कर्जतकर मोहीम हातात घेतली आहे. त्या माध्यमातून पालिकेला शेवटचा अल्टिमेटम दिला होता त्यानुसार नगरपरिषदेने कोणतीही दरवाढ करण्यात येणार नाही. असे लेखी पत्र देऊन उर्वरित विषयावर सुद्धा वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करू असे त्यामध्ये स्पष्ट केल्याने प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आलेले साखळी उपोषण स्थगित करण्यात आल्याचे आम्ही कर्जतकरच्या वतीने सांगण्यात आले. या विषयावर कर्जत नगरपरिषदेने नमते घेतल्याने कर्जतकरांच्या एकजुटीचा ऐतिहासिक विजय झाल्याचेही सांगण्यात आले.

### नगर परिषद प्रशासन नरमले

मालमत्ता करवाढी विषयी कर्जत नगरपरिषदेने घेतलेल्या भूमिकेचा निर्णय सांगण्यासाठी आम्ही कर्जतकरच्या सदस्यांनी कर्जतच्या लोकमान्य टिळक चौकात कर्जतकरांना उपस्थित राहण्यास सांगितले होते. त्यानुसार अनेक कर्जतकर उपस्थित राहिले होते. याप्रसंगी रमाकांत जाधव यांनी मालमत्ता करवाढ प्रकरणी मुख्याधिकारी वैभव हिरवे यांनी चांगले सहकार्य केले असून कर्जतकरांसाठी चांगला निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले. त्यानंतर माजी नगरसेवक प्रवीण गांगल यांनी नगरपरिषदेने दिलेल्या पत्राचे सविस्तर वाचन केले. योगेश पोथरकार यांनी नगरपरिषदेने दिलेल्या पत्रातील काही गोष्टी उपस्थितांना खुलासेवार सांगितल्या.

ॲड. कैलास मोरे यांनी, 'हा समस्त कर्जतकरांचा ऐतिहासिक विजय आहे. आपल्या या लढ्याला यश आले असून त्यामधून अनेक चांगल्या गोष्टी आपल्याला समजल्या असून नगरपरिषदेने केलेली करवाढ चुकीची होती. हे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे अग्निशामक कर रद्द करण्यात आले आहे. मालमत्तेच्या घसाऱ्यावर कर आकारणी करणे. २०२१ – २२ ते २०२४ – २५ कोणतीही करवाढ नाही. तसेच सर्व्हे साठी नियुक्त केलेल्या ठेकेदाराला सर्व्हेच्या दुरुस्तीसाठी कोणतीही अतिरिक्त रक्कम अदा करण्यात येणार नाही. असे निर्णय घेतले आहेत.

या प्रसंगी माजी नगराध्यक्ष धनंजय चाचड, रजनी गायकवाड, राजेश लाड, नगरसेवक सोमनाथ ठोंबरे, मुकुंद मेंढी, धर्मेंद्र मोरे, विकास चित्ते, अशोक शिंदे, हरिश्चंद्र यादव, विनोद पांडे, कृष्णा जाधव, शिवसेवक गुप्ता, गणेश ठोसर, डॉ. गीता काळे आदींसह कर्जतकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ३ वरून

# खुल्या गटात करण माळी, ऋतुजा सकपाळ अव्वल

**बक्षिसांचा तपशिल**

**पुरुष खुला गट (अंतर १० किलोमीटर)** : प्रथम क्रमांक करण माळी (२५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, ट्रॅकसूट, प्रमाणपत्र, मेडल), द्वितीय क्रमांक रामू पारधी (१५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, ट्रॅकसूट, प्रमाणपत्र, मेडल), तृतीय क्रमांक प्रमोद वाक्षे (१० हजार रुपये, सन्मानचिन्ह, ट्रॅकसूट, प्रमाणपत्र, मेडल), उत्तेजनार्थ २२ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये, प्रमाणपत्र, मेडल.

**महिला खुला गट (अंतर १० किलोमीटर)** : प्रथम क्रमांक ऋतुजा सकपाळ (२५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, ट्रॅकसूट, प्रमाणपत्र, मेडल), द्वितीय क्रमांक सुप्रिया माळी (१५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, ट्रॅकसूट, प्रमाणपत्र, मेडल), तृतीय क्रमांक सोनी जैस्वाल (१० हजार रुपये, सन्मानचिन्ह, ट्रॅकसूट, प्रमाणपत्र, मेडल), उत्तेजनार्थ २२ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये, प्रमाणपत्र, मेडल.

**१७ वर्षाखालील मुले गट (अंतर ५ किलोमीटर)** : प्रथम क्रमांक कुशल शिवारी (५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), द्वितीय क्रमांक यश नात्ती (३ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तृतीय क्रमांक इब्राहिम (२ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तसेच दहा उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये.

**१७ वर्षाखालील मुली गट (अंतर ५ किलोमीटर)** : प्रथम क्रमांक देविका सोनावणे (५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), द्वितीय क्रमांक संजीवनी दीपक (३ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तृतीय क्रमांक धनश्री घाडगे (२ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तसेच दहा उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये.

**१४ वर्षाखालील मुले गट (अंतर ५ किलोमीटर)** : प्रथम क्रमांक सार्थक पाटील (५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), द्वितीय क्रमांक आर्यश पाटील (३ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तृतीय क्रमांक आयुष यादव (२ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तसेच दहा उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये.

**१४ वर्षाखालील मुली गट (अंतर ५ किलोमीटर)** : प्रथम क्रमांक मयुरी चव्हाण (५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), द्वितीय क्रमांक पूजा सावंत (३ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तृतीय क्रमांक श्रिया पाटील (२ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तसेच दहा उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये.

**खारघर दौड (वैयक्तिक, शालेय, सोयायटी, व इतर अशा चार गटांत) अंतर ३ किलोमीटर** : स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**ज्येष्ठ नागरिक दौड पुरुष गट (अंतर २ किलोमीटर)** : प्रथम क्रमांक सुरेंद्र दशवरे (५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), द्वितीय क्रमांक सीताराम जितेकर (३ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तृतीय क्रमांक सुशिल गुप्ता (२ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तसेच सात उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये.

**ज्येष्ठ नागरिक दौड महिला गट (अंतर २ किलोमीटर)** : प्रथम क्रमांक अनिता वर्मा (५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), द्वितीय क्रमांक रिता कांडपाळ (३ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तृतीय क्रमांक जसपाल कौर (२ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तसेच सात उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये.

**पत्रकार गट (अंतर २ किलोमीटर)** : प्रथम क्रमांक सुनील तावडे (५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), द्वितीय क्रमांक सुनील पाटील (३ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तृतीय क्रमांक सुधीर शर्मा (२ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मेडल, प्रमाणपत्र), तसेच सात उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्समध्ये खारघर मॅरेथॉन प्री इव्हेंट्स अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धांसाठी 'व्यसनमुक्ती' हा मॅरेथॉनचा विषय देण्यात आला होता. या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे आहे.

**रांगोळी स्पर्धा** : प्रथम अंजली खोंड (३ हजार रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र), द्वितीय विलास पाटील (२ हजार रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र), तृतीय अदिती भट (१ हजार रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र.

**मोनो ॲक्टिंग** : प्रथम राजश्री सुर्वे (२ हजार रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र), द्वितीय शिवांश काळे (१५०० रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र), तृतीय प्रगती मिश्रा (१ हजार रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र)

**ब्लॉग रायटिंग** : प्रथम सुहा चोगले (२ हजार रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र), द्वितीय श्लोक शिंदे (१५०० रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र), तृतीय सारा नियाझी (१ हजार रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र), उत्तेजनार्थ दीपक शिंदे, क्रितीका साबू व रीना यादव (प्रत्येकी ५०० रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र)

**पोस्टर मेकिंग** : प्रथम शिवानी कुमारी (२ हजार रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र), द्वितीय चेतन टेमखाने (१५०० रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र), तृतीय क्रमांक साक्षी पाटील व मेहेक खान (प्रत्येकी ५०० रुपये, ट्रॉफी, प्रमाणपत्र)

# खारघर मॅरेथॉन २०२३



















# मुलांना शिकवू की शाळेत आणायला जाऊ?

## खालापूरजवळील दांडवाडी शाळेतील शिक्षकाची तारेवरची कसरत

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूरातील बावोशी ग्रामपंचायत हद्दीतील दुर्गम भागात असणाऱ्या दांडवाडी आदिवासी येथील जिल्हा परिषद शाळेतील १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना शिकवण्याच्या जबाबदारीचा भार भारत आढे या एकाच शिक्षकावर खालापूर गटशिक्षणाधिकाऱ्यांनी टाकल्याने विद्यार्थ्यांना वीटभट्टीवर जाऊन जमवाजमव करून आणायचे की त्यांना शिकवावे अशी दुहेरी कसरत करण्याची वेळ या शिक्षकावर आली आहे.



वावोशी–दांडवाडी येथील आदिवासी हे रोजगारासाठी आजूबाजूच्या गावामधील वीट भट्ट्यांवर स्थलांतरित झाले असून त्यांची मुले देखील त्यांच्यासोबत त्या ठिकाणी राहत आहेत. त्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता या मुलांना शाळेत नेण्यासाठी शिक्षकांना रोजच ३ किलोमीटरची कसरत करावी लागत आहे. यामध्ये शिक्षकांचा बराचसा वेळ विद्यार्थ्यांची जमवाजमव करण्यातच जातो. तसेच ही शाळा दुर्गम व डोंगराळ भागात असल्याने येथील शिक्षकांना पायी डोंगर चढून वर जावे लागते. त्यामुळे हे शिक्षक शाळेत पोहोचेपर्यंत या शाळेतील विद्यार्थ्यांवर लक्ष द्यायला कुणीच नसते. त्यामुळे काही विद्यार्थी नुसतेच बसून असतात तर काही विद्यार्थी शिक्षक येईपर्यंत कंटाळून परत घरी देखील जातात. तर काही मुलांचा अभ्यासही बुडतो. यामध्ये शिक्षकांना पुन्हा या विद्यार्थ्यांना शाळेत बोलावून त्यांना शिकवायचे काम करावे लागते. अशातच या शाळेत १ली ते ४ थी असे ४ वर्ग असल्याने या चारही वर्गाच्या मुलांना शिकवण्याची जबाबदारी फक्त भारत आढे या एकाच शिक्षकावर येऊन पडली असल्याने त्यांची पूर्णतः दमछाक होत आहे.

या ठिकाणी दुसरा शिक्षक असताना देखील त्या शिक्षकाची नेमणूक इतर शाळेवर करण्यात आल्याने या सर्व वर्गांना शिकवण्याचा भार एकाच शिक्षकावर येऊन पडला आहे. त्यामुळे या ठिकाणी किमान दोन शिक्षक असणे गरजेचे आहे. या परिस्थितीची माहिती खालापूर पंचायत समितीचे शिक्षण विभागाचे अधिकारी यांना वेळोवेळी देऊन देखील या शाळेवर आधीच्या मूळ शिक्षकाची नेमणूक करण्यात आलेली नाही. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून या ठिकाणी याआधी असणाऱ्या मूळ शिक्षकाची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी येथील पालक व ग्रामस्थांकडून केली जात आहे. एकाच शिक्षकावर चार वर्गांचा भार पडत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी या ठिकाणी दोन शिक्षक असावेत, अशी आमची प्रशासनाकडे मागणी असल्याचे वावोशी दांडवाडीतील पालक व ग्रामस्थांनी सांगितले.

### ‘त्या’ शिक्षकालाही रुजू करावे!

**दांडवाडी येथील काही आदिवासी रोजगारासाठी आजूबाजूच्या गावातील वीटभट्टीवर स्थलांतरित झाले असल्याने त्या विद्यार्थ्यांची जमवाजमव करीत शाळेत आणावे लागते. त्यानंतरच अध्यापनाचे काम करावे लागते. त्यामुळे या ठिकाणी आधीच्या मूळ शिक्षकाला पुन्हा रुजू केल्यास मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देता येईल असे शिक्षक भरत आढे यांनी सांगितले.**

# बुद्धविहार व सांस्कृतिक भवनाच्या मदतीसाठी आमदार शिवेंद्रराजे भोसलेंचे सहकार्याचे आश्वासन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सातारा येथील जावली तालुक्यात लवकरच बुद्धविहार व सांस्कृतिक भवनाची उभारणी करण्यात येणार आहे. साताऱ्याचे विद्यमान आमदार छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांनी याबाबत निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही ऑल इंडिया शेड्युल कास्ट/शेड्युल ट्राईब, ऑदर बॅकर्वड क्लास मायनॉरिटीझ फेडरेशनला दिली. यासाठी फेडरेशनचे सेक्रेटरी अजित दशरथ रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचे समर्थक अमित रोकडे यांनी प्रयत्न केले होते.

त्यांच्या प्रयत्नांमुळे शुक्रवारी (दि. २०) उत्कर्ष तरुण मंडळ–करंजे येथील बौद्धवस्तीतील रहिवाशांनी बुद्धविहार व सांस्कृतिक भवन उभारणीसाठी आर्थिक मदत मिळण्याकरीता आमदार छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांची भेट घेऊन मंडळाचे अध्यक्ष संजय



शिवराम कांबळे, अमित कांबळे, रविंद्र कांबळे, नितीन कांबळे, सुभाष कांबळे पोलीस पाटील, अमर कांबळे, राजेंद्र गंगावणे, शिवाजी कांबळे, आकाश कांबळे आदी ग्रामस्थांनी निवेदन दिले.

आमदार शिवेंद्रराजे भोसले यांनी मार्च महिन्यात नक्कीच निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिल. त्यामुळे आमदार भोसले यांचे करंजे ग्रामस्थ आणि बौद्धवस्तीतील रहिवाशांनी आभार मानले.

# डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे तळाशेत येथे स्वच्छता अभियान



**माणगाव : प्रतिनिधी**

भारत देशाचे स्वच्छतादूत पद्मश्री डॉ. श्री. अण्णासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या सौजन्याने माणगाव तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत तळाशेत (इंदापूर) हद्दीत स्वच्छता अभियान रविवारी (दि. २२) राबविण्यात आले. या स्वच्छता अभियानामध्ये १४७३ श्री सदस्यांनी सहभाग घेतला. या अभियानामध्ये ग्रुप ग्राम पंचायत तळाशेत (इंदापूर) शहरातील सरकारी कार्यालयांचे प्रांगण व शहरातील प्रमुख रस्ते, स्मशानभूमी यांची साफसफाई करण्यात येऊन इंदापूर गाव चकाचक करण्यात आले.

सकाळपासून डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या श्री सदस्यांनी स्वच्छतेची साधने घेऊन साफसफाई केली. यामध्ये रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली गवत, कचरा, प्लास्टिक बाटल्या उचलून स्वच्छतेचे काम स्वयंस्फूर्तीने व शिस्तबद्धपणे केले.

डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या सौजन्याने वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये आरोग्याशिबीर, वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, दिव्यांग व्यक्तींना साहित्य वाटप, नैसर्गिक आपत्कालीन मदत, रक्तदान, धरणातील गाळ काढणे, जलपुनर्भरण ई. उपक्रम सामाजिक बांधिलकी या नात्याने राबविले जातात. याच कार्याचा एक भाग म्हणून ग्रुप ग्रामपंचायत तळाशेतचे प्रांगण, इंदापूर पोलीस स्टेशन परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र, इंदापूर बस स्थानक, इंदापूर तळा रोड, कालवा रोड, गौळवाडी रोड, वाढवण रोड ते कलानगर, इंदापूर बाजारपेठ, समर्थनगर व एस एस निकम हायस्कूल परिसर आणि स्मशानभूमी परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

अभियानाची सुरुवात इंदापूर बसस्थानक येथून झाली. अभियानामध्ये ३४ टन कचरा उचलण्यात आला. नियोजित डम्पिंग ग्राऊंडमध्ये टाकण्यात आला. भाजप माणगांव तालुका अध्यक्ष संजयआप्पा ढवळे, जिल्हा परिषद सदस्या स्वाती नवगणे, ग्रुप ग्राम पंचायत तळाशेत सरपंच रंजना राजेंद्र नवगणे, उपसरपंच समीर मेहता, अनिल नवगणे, काका नवगणे, नवजीवन विदयामंदिर सचिव अविनाश मांडवकर, वाहतूक नियंत्रक श्री. शेलार, उपविभागीय कृषी अधिकारी आनंद कांबळे, पत्रकार भाऊ सापळे यांनी उपस्थित राहून सहभाग घेतला.

# विद्यार्थ्यांनी छंद जोपासावेत -संजय गुंजाळ



**मुरुड : प्रतिनिधी**

वसंतराव नाईक कला वाणिज्य महाविद्यालय,मुरुड व कोकण मराठी साहित्य परिषद (युवाशक्ती) मुरुड शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या अंतर्गत प्रभावी वक्तृत्व व सूत्रसंचालनाची कार्यशाळा वसंतराव नाईक कला वाणिज्य महाविद्यालय, मुरुड येथे घेण्यात आली होती.

कार्यशाळेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य मेहबूब नगरबावडी, मुख्य वक्ते व सूत्रसंचालक, कवी हेमंत बारटक्के, कोमसाप मुरुड शाखाध्यक्ष संजय गुंजाळ, उपप्राचार्य विश्वास चव्हाण, वासंती उमरोटकर, श्रीशैल बहिरगुंडे , कोमसाप रायगड युवशक्ती प्रमुख सिद्धेश लखमदे, कोमसाप मुरुड उपाध्यक्षा उषा खोत, कार्याध्यक्ष अरुण बागडे, सचिव नैनिता कर्णिक, माजी तहसीलदार नयन कर्णिक, उर्मिला नामजोशी उपस्थित होते.

प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख श्रीशैल बहिरगुंडे म्हणाले, मराठी भाषा जी जन्म भाषा आहे. त्यामुळे या भाषेकडे दुर्लक्ष्य करून चालणार नाही. जीवनात हवेला महत्व आहे तसे मराठी भाषेला सुद्धा महत्व आहे.किती हि भाषा असल्यातरी मराठीची सर कोणालाही येणार नाही. २१ वे शतक हे उदारीकरणाचे विज्ञान तंत्रज्ञानाचे आहे. या युगाला सामोरे जाणे प्रत्येक प्रादेशिक भाषेला आवश्यक बनले आहे. आपल्या माय बोलिला पुढे नेण्यासाठी आमूलाग्र बदलाची व कृतीही नितांत गरज आहे. कोमसाप मुरुड शाखाध्यक्ष संजय गुंजाळ यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

उपप्राचार्य विश्वास चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. मुख्य वक्ते कोमसाप तळा शाखाध्यक्ष, सूत्रसंचालक, कवी हेमंत बारटक्के यांनी तासाभराच्या व्याख्यानात उत्तम वक्ता व सूत्रसंचालक कसा असावा हे सांगितले.

कार्यशाळेचा लाभ तालुक्यातील १०० हून अधिक विध्यार्थ्यांनी घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन म्हात्रे सरांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कोमसाप युवाशक्ती तालुकाप्रमुख आशिष पाटील यांनी परिश्रम घेतले.

# ‘केएमसी’च्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेसह केले पाताळगंगा नदीचे पूजन

## पर्यावरणप्रेमींना आगळावेगळा संदेश

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुका तहसील कार्यालय, खोपोली नगरपरिषद, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट आणि के. एम. सी. कॉलेज – खोपोली यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध धाकटी पंढरी–ताकई येथील विठ्ठल मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवत आणि बारमाही वाहणाऱ्या पाताळगंगा नदी पात्राचे पूजन करून पर्यावरप्रेमींना आगळावेगळा संदेश दिला आहे.



भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, स्वच्छ भारत अभियान आणि चला जाणूया नदीला या चळवळी मार्फत के. एम. सी. कॉलेजच्या एन. सी. सी. कॅडेट्स आणि विद्यार्थ्यांसाठी शनिवारी संवाद शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. धाकटी पंढरीच्या विठ्ठल मंदिर परिसरात साफसफाई केल्यानंतर पर्यावरणाचे नदीचे सर्वांगीन महत्व जाणून घेत जल प्रदूषण टाळावे हा उद्देश आणि हेतू प्रसारित करण्यासाठी सर्वांनी प्रायोगिक तत्वावर जलपूजन विधीमधे भाग घेतला. मोठ्या संख्येने एन. सी. सी. कॅडेट्स, विद्यार्थी वर्ग आणि खोपोली नगरपालिकेचे सफाई कर्मचारी या उपक्रमात सहभागी झाले होते.

खालापूर तालुक्याचे तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार सुधाकर राठोड, खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अनुप दूरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर समन्वयक भक्ती साठेलकर, के. एम. सी. कॉलेजतर्फे प्राचार्य प्रताप पाटील आणि शीतल गायकवाड यांनी या उपक्रमात उपस्थिती दर्शवली. सर्वांनी सर्वाजनिक स्वच्छता आणि पर्यावरणाचे संवर्धन करण्याची शपथही यावेळी घेतली. पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अरुण गोविंद जाधव यांनी अशा उपक्रमासाठी आपली संस्था नेहमीच पुढाकार घेईल असे या निमित्ताने अभिवचन दिले.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरिता संपादीत होणाऱ्या जमिनीच्या साडेबावीस टक्के योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेल्या मौजे चिंचपाडा, निवाडा यु.के. क्रं. CHMO-ICIG–२२५ मधील बांधकाम क्र. MO–१६५ या बांधकामाखालील जमीन बांधकामधारक श्री. अनिल जनार्दन केणी, श्री. सुधीर जनार्दन केणी, श्रीमती. मोहिनी राजेंद्र केणी, श्री. प्रसाद राजेंद्र केणी यांचेकडून संपादित झालेली आहे. या मिळकतीपोटी त्यांना पुष्पकनोड (वडघर) येथील भूखंड क्र. २१, सेक्टर- आर १, क्षेत्र - १२०.०० चौ.मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे. सदर भूखंडाचा करारनामा दि. १९.०९.२०१७ रोजी निष्पादित करण्यात आला आहे.

बांधकामधारक श्री. अनिल जनार्दन केणी, श्री. सुधीर जनार्दन केणी, श्रीमती मोहिनी राजेंद्र केणी, श्री. प्रसाद राजेंद्र केणी यांनी पुष्पक नोड भूखंड क्र.२१, सेक्टर- आर–१, क्षेत्र १२०.०० चौ.मी. या भूखंडाबाबत दुय्यम निबंधक पनवेल नोंदणी क्रं. पवल२–१७५५९–२०२२, दि.१६/१२/२०२२ यांच्याकडील नोंदणीकृत केलेले हक्कसोडपत्र सादर केले आहे. सदरील हक्कसोडपत्रात नमूद केल्यानुसार त्यांना वाटपित झालेल्या भूखंडाबाबत खालील खातेदारांच्या लाभात हक्क सोडले आहेत :-

| निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहून घेणार | निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहून देणार |
|---|---|
| (i) | (ii) |
| १. श्री. सुधीर जनार्दन केणी | १. श्री. अनिल जनार्दन केणी<br>२. श्रीमती मोहिनी राजेंद्र केणी<br>३. श्री. प्रसाद राजेंद्र केणी |

उपरोक्त हक्कसोडपत्रानुसार केवळ टेबल क्र. (i) मध्ये नमूद केलेल्या व्यक्तीच सदरील भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात. हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत अशा व्यक्तींच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

तरी वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि), तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि)**
**तळ मजला, सिडको भवन,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई–४००६१४.**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४२६/२०२२-२३



## जाहीर हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील तपशिलांमध्ये सविस्तरपणे वर्णन केलेली जमिन मिळकत कायम खरेदी करण्याबाबत खरेदी करारनामा संबंधित अभिलेखात नमूद जमिन मालकांच्या सोबत केलेला आहे. तसेच सदर जमिन खरेदी व्यवहाराच्या अनुषंगाने आमचे अशिलांना सदर जमिन मालकांनी कायम स्वरुपी कधीही रद्द न होणारे अखत्यार पत्र दिलेले आहे. सदर व्यवहाराच्या अनुषंगाने उक्त जमिन मालकांनी वरीच मोठी रक्कम आमचे अशिलांकडून जमिनीचा मोबदला म्हणून स्वीकारली आहे तसेच आमचे अशिलांना व्यवहार पूर्ततेची हमी दिलेली आहे.

| अनु क्र | शेतकऱ्यांचे नाव | ॲवार्ड युनिट केस क्रमांक | सर्व्हे क्रमांक | क्षेत्र | हे. आर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | रामचंद्र गणपत पाटील (मयत)<br>वासुदेव रामचंद्र पाटील (मयत)<br>वारस : श्री. हेमंत वासुदेव पाटील | ४४ | १७१/५,<br>१७२/८ | १-०७-४ | ०-४७-९ |
| २ | पद्मा पोशा पाटील (मयत)<br>मोहन पद्मा पाटील (मयत)<br>वारस : महेश मोहन पाटील | २६ | १६५/२,<br>१६८/९<br>१६९/९, १७२/५ | २-२४-४ | १-०५-० |
| ३ | बाळ्या द्वारका भोईर (मयत)<br>दया बाळ्या भोईर (मयत)<br>वारस : श्री दिनेश दया भोईर | ३३ | १६६/३,<br>१७०/४,<br>१७१/१ | ०-३७-१२ | ०-३८-२ |
| ४ | भुऱ्या बारक्या पाटील (मयत)<br>वारस : श्री. सदानंद भुऱ्या पाटील | ३६ | १७०/२, १७१/८,<br>१७९/४, १८०/३ | १-०२-१२ | ०-४३-२ |
| ५ | महादू पद्या पाटील (मयत)<br>धर्मा महादू पाटील (मयत)<br>वारस : श्री. भरत धर्मा पाटील | ३८ | १५२/३ | ०-१२-४ | ०-१२-५ |
| ६ | दामाजी धर्मा पाटील (मयत)<br>श्री. सदानंद दामाजी पाटील | २१ | १६५/१०, १६९/२,<br>१७०/१०, १७१/६ | ०-२२-० | ०-२२-३ |
| ७ | उमाबाई धर्मा पाटील | २ | १६५/७, १६६/६,<br>१६८/१, १७२/१ | ०-०१-० | ०-४१-५ |
| ८ | कमळीबाई दामाजी भोईर | ४ | १७०/११ | ०-१२-८ | ०-१२-६ |
| ९ | श्री. वसंत बाबू पाटील | ४७ | १५२/७ | ०-११-२२ | ०-११-९ |
| १० | राम नारायण जोशी (मयत)<br>वारस : श्री कृष्णा उर्फ शंकर राम जोशी | ४२ | १७१/२,<br>१७२/६ | ०-२१-१२ | ०-२२-० |
| ११ | चांगु धाया पाटील (मयत)<br>वारस : श्री. नारायण चांगु पाटील | १४ | १६८/६,<br>१६९/४ | ०-२७-१२ | ०-२८-१ |
| १२ | गजानन अंबाजी पाटील (मयत)<br>वारस : श्री. हरी गजानन पाटील | १० | १६५/८, १६६/७,<br>१६८/२, १६८/८ | १-१३-८ | ०-५३-८ |
| १३ | काळ्या पांड्या भोईर (मयत)<br>वारस : श्री. पांडुरंग काळ्या भोईर | ५ | १६९/१२<br>१७०/१४ | ०-१३-० | ०-१३-१ |
| १४ | श्रीम. मंगळीबाई काळ्या पाटील (मयत)<br>वारस : श्री. संजय कृष्णा पाटील | ३९ | १७०/१२,<br>१७१/७ | १-०५-४ | ०-४५-४ |
| १५ | श्रीमती. जनाबाई मारुती म्हात्रे (मयत)<br>वारस : श्री. रामचंद्र मारुती म्हात्रे | १७ | १७०/९,<br>१६५/३ | १-०१-४ | ०-४१-८ |
| १६ | अनंत नारायण पाटील (मयत)<br>विकास अनंत पाटील (मयत)<br>वारस : श्री. विपुल विकास पाटील | १ | १५२/६,<br>१६९/६,<br>१७०/५ | १-१२-० | ०-५३-६ |
| १७ | नथुराम जानु पाटील (मयत)<br>वारस : श्री. यशवंत नथुराम पाटील | २३ | १६५/५ | ०-३१-४ | ०-३१-६ |
| १८ | भिमाबाई रामा पाटील (मयत)<br>वारस : श्री. गणेश रामा पाटील | ३५ | १७०/१५,<br>१७१/९ | ०-३९-१२ | ०-४०-४ |
| १९ | हरीभाऊ बुध्या पंडित (मयत)<br>वारस : श्री. महेश हरीभाऊ पंडित | १५ | १७२/९ | ०-२८-० | ०-२८-६ |
| २० | बाळाराम शिवा पाटील (मयत)<br>वारस : श्री. गणेश बाळाराम पाटील | ३२ | १६५/६ | ०-३०-० | ०-३०-३ |
| २१ | पांडूरंग हिरा पाटील (मयत)<br>वारस : श्री. अरुण पांडूरंग पाटील | २९ | १६६/२,<br>१७३/६ | १-०६-८ | ०-४६-८ |
| २२ | महादेव शिवा पाटील (मयत)<br>वारस : श्री. राजेश महादेव पाटील | ३७ | १७०/७, १७१/४,<br>१७९/२ | १-०२-४ | ०-४२-५ |
| २३ | काळ्या जानू पाटील (मयत)<br>प्रभाकर काळ्या पाटील (मयत)<br>वारस : श्री. अनिल प्रभाकर पाटील | ६ | १७३/९ | ०-०६-८ | ०-०६-६ |
| २४ | गोपाळ आंधळ्या पाटील (मयत)<br>वारस : श्री. ज्ञानेश्वर गोपाळ पाटील | १२ | १६५/९, १६८/३,<br>१६९/१, १६९/७ | २-३९-० | ०-३९-५ |
| २५ | चंदर कुंडया तांडेल (मयत)<br>हिराजी चंदर तांडेल (मयत )<br>वारसः श्री. सुनिल हिराजी तांडेल | १३ | १५२/२ १६९/३,<br>१७०/१,<br>१७३/५ | ०-३०-० | ०-३०-३ |
| २६ | सोमा गणपत पाटील (मयत)<br>भालचंद्र सोमा पाटील (मयत)<br>वारस : श्रीम. नलिनी भालचंद्र पाटील | ५१ | १६८/७,<br>१७२/२ | १-३-४ | ०-४३-९ |
| २७ | श्री. हिरा धनाजी पाटील | ५२ | १५२/४ | ०-१०-४ | ०-१०-४ |
| २८ | काशिनाथ हिरा पाटील (मयत)<br>वारस : श्री. मोहन काशिनाथ पाटील | ८ | १७३/३ | ०-२४-८ | ०-२४-७ |
| २९ | नामीबाई नामदेव पाटील (मयत)<br>एकनाथ नामदेव पाटील (मयत)<br>वारस : श्री यशवंत एकनाथ पाटील | २४ | १७३/४ | ०-१२-८ | ०-१२-६ |
| ३० | नामुबाई गोमाजी पाटील (मयत)<br>वारस : श्री. जगदिश गोमाजी पाटील | २५ | १६८/४ | ०-१६-८ | ०-१६-८ |
| ३१ | ठकुबाई हिरा पाटील (मयत)<br>महादेव हिरा पाटील (मयत)<br>वारस : श्री. माणीक महादेव पाटील | १९ | १६६/४ | ०-२७-९ | ०-२७-९ |
| ३२ | शंकर काशिनाथ म्हात्रे (मयत)<br>वारस : श्री. प्रभाकर शंकर म्हात्रे | ४८ | १६५/४ | ०-३६-० | ०३६-० |
| ३३ | सावित्री बघु म्हात्रे (मयत)<br>वारस : श्री. विश्वनाथ बाबु म्हात्रे | ५० | १७०/६,<br>१७३/८ | १-०२-० | ०-४२-६ |
| ३४ | जनार्दन आत्माराम पाटील (मयत)<br>वारस : श्री. बाळकृष्ण जनार्दन पाटील | १६ | १७३/७ | ०-१२-१२ | ०-१२-९ |
| ३५ | प्रभाकर चागो पाटील (मयत)<br>वारस श्री. प्रशांत प्रभाकर पाटील | ३१ | १५२/१ | ०-२८-० | ०-२२-० |
| ३६ | लक्ष्मण जानू पाटील (मयत)<br>वारस : श्री. सहदेव लक्ष्मण पाटील | ४५ | १६६/८,<br>१७०/३ | ०-३३-० | ०-३३-३ |
| ३७ | श्रीम. लक्ष्मीबाई मेघनाथ मढवी | ४६ | ४६८/५, १७२/३ | ०-१८-४ | ०-५९-१ |

तरी तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर जमिनीमध्ये आमचे अशिलाचा हितसंबंध निर्माण झाला असल्याने व आमचे अशिल सदर जमिन मिळकतीच्या अनुषंगाने मिळणारे भूखंड खरेदी घेण्यास कायदेशीर हक्कदार असल्याने सदर जमिन मिळकतीच्या संभाव्य मिळणाऱ्या भूखंडामध्ये कोणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, ट्रस्ट वा अन्य प्रकारचे संघटन यांनी कोणत्याही प्रकारचे खरेदी विक्री अथवा विकसन, गहाण, तारण इत्यादी प्रकारचा व्यवहार करु नये. तसेच आमचे अशिलांचे सदर जमीन मिळकतीच्या अनुषंगाने मिळणारे भूखंड खरेदी करण्याच्या हक्कात अडथळे व बाधा निर्माण करु नये. तसे केल्यास संबंधितांविरुध्द आमचे अशिल दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कारवाई करतील तसेच आमचे अशिलांचे होणारे नुकसानीस व परिणामास संबंधित जबाबदार राहतील कृपया याची नोंद घ्यावी. या उपर परस्पर असा कोणताही व्यवहार केला असल्यास तो ताबडतोब रद्द करावा तसेच संबंधीत जमीनधारक कोणतीही दिशाभूल करून खरेदी व्यवहार करण्याचा प्रयत्न करीत असल्यास असा व्यवहार कोणीही करुन नये असे आढळून आल्यास आमचे अशिलांना संबंधित जमिन धारकावर दिवाणी तसेच फौजदारी कारवाई करण्याचा सल्ला दिला जाईल, तसेच असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांचे अपरोक्ष कोणी केला असल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही कृपया याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- २१/०१/२०२३

**सही/-**
**ॲड. अरुण कुमार**
**बी. ए. एल.एल.बी. (हायकोर्ट)**
ऑफीस नं. ८, एन.बी.सी. कॉम्पलेक्स, विश्वकमल हॉटेलच्या मागे, सी.बी.डी. बेलापूर स्टेशन जवळ, प्लॉट नं. ४३, सेक्टर ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

# खारघर मॅरेथॉन २०२३
























































दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com